


# आम्ही बी घडलो तुम्ही बी घडाना..

## ज्ञान प्रबोधिनी

## बचत गटांद्वारे सर्वांगीण विकास













# ज्ञान प्रबोधिनी ग्राम विकसन प्रभाग

पुणे जिल्ह्याच्या हवेली, भोर, वेल्हे व पुरंदर या ४ तालुक्यांमधील २५० खेड्यांमध्ये १९६५ पासून सर्वंकष ग्रामीण विकासाचे काम. स्थानिक नेतृत्वविकसन, स्त्री शक्ती प्रबोधन व चिरंजीवी विकासासाठी लोकसंघटन ही उद्दिष्टे.

## पाणी

✻ **पाणलोट क्षेत्र विकास** - ३१ गावांच्या १६००० हेक्टर क्षेत्राची सर्वंकष विकासाची योजना. सणसवाडी, ससेवाडी या गावांमध्ये पथदर्शी प्रकल्प • हातपंप दुरूस्तीवर संशोधन व काम • सहकारी पाणीवापर संस्था उभारण्यासाठी महाराष्ट्रभर प्रयत्न.

## ऊर्जा

✻ **गोमसंयंत्र** - गोमसंयंत्र म्हणजेच बायोगॅसचा १९७५ पासून प्रसार. ३ जिल्ह्यांमध्ये सुमारे ४००० संयंत्रांचे बांधकाम • काहींना स्वच्छतागृहे जोडण्याचा यशस्वी प्रयोग.

✻ **सौर ऊर्जा** -सौर ऊर्जेवर चालणाऱ्या उपकरणांचे शिवापूर येथे स्थायी प्रात्यक्षिक.

## स्वयंरोजगार

✻ **व्यावसायिक प्रशिक्षण** - शिवापूर येथे कृषि-तांत्रिक विद्यालयात महाराष्ट्र शासनाने मान्य केलेले टर्नर, वेल्डर, वायरमन, संगणक परिचालक व माहिती तंत्रज्ञान असे अभ्यासक्रम. • युवतींसाठी इलेक्ट्रॉनिक असेंब्लीचे प्रशिक्षण. • तंत्रशिक्षणाबरोबर वर्तनकौशल्ये, विक्री कौशल्ये व उद्योजकता मार्गदर्शन. स्थानिक साधन संपत्तीवर आधारित फळ प्रक्रिया, विविध खाद्यपदार्थ, नाचणी-वरई पासून सकस पौष्टिक आहार, बांबूच्या वस्तू यासारख्या उत्पादनांसाठी प्रशिक्षण

✻ **महिला बचत गट**- प्रत्येकी २० महिला सदस्य संख्या असलेले सुमारे १५० बचत गट चालू • काही उत्पादक उपक्रमांद्वारे राहणीमान उंचावण्यासाठी प्रशिक्षण.

✻ **शिवगंगा उद्योग**-वाखापासून शोभिवंत वस्तू करण्याचा महिलांचा कुटिरोद्योग.

---

*पाणी ऊर्जा हाताला काम । संख्या शिक्षण संघटित ग्राम ॥*

---

# आम्ही बी घडलो ।
# तुम्ही बी घडाना ॥

## ज्ञान प्रबोधिनी : बचत गटाद्वारे सर्वांगीण विकास

**ग्रामविकसन प्रकाशन-१**

ज्ञान प्रबोधिनी

५१०, सदाशिव पेठ, पुणे-४११ ०३०.

**प्रकाशक :**
प्रभाग प्रमुख
ग्राम विकसन विभाग
ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ,
पुणे–४११ ०३०.

दूरभाष क्र. : ०२०–२४४७७६९१, २४४९१९५७
**फॅक्स क्र : ०२०–२४४९१८०६**

इ–मेल : **jpgram@sify.com**

**मुद्रक :**
रॅशनल प्रिंटर्स,
२१६, नारायण पेठ,पुणे ४११०३०

**© सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन**

प्रथम आवृती
रथसप्तमी, शके १९२२

द्वितीय आवृती
गुढीपाडवा, शके १९२६
(२१ मार्च २००४ )

**किंमत : रुपये ५०/–**

# आम्ही बी घडलो ।
# तुम्ही बी घडाना ॥

## ज्ञान प्रबोधिनी : बचत गटांद्वारे सर्वांगीण विकास

★ प्रस्तावना १

★ कहाणी घडण्याची ३

★ गटाचं तंत्र ७

- गट कशासाठी
- किती जणींचा
- कसा चालवायचा
- किती रक्कम भरायची
- रकमेचं काय करायचं
- परतफेड कशी करायची
- रक्कम कोणाकडे द्यायची
- मोठी रक्कम हवी असेल......
- व्यवहाराची नोंद कशी होते
- काही खर्च येतो का
- गटाचे फायदे
- नियम

★ गट कसे चालतात १३

- गटामध्ये नियम असे ठरले
- सेवाशुल्क किती भरायचे
- सेवाशुल्काचा दर बदलला
- वेळेची किंमत
- गुंतवणुकीसाठी दर कमी हवा
- स्वत:ला मुरड घालायची
- जामीनदाराची विश्वासाची हमी

★ गटात आले म्हणून बाई १९

- मला नीटनेटकं रहावसं वाटतं
- माझी नवी ओळख
- गटानं मला बळ दिलं
- गटातून मिळाली माहितीची..

★ गटाची साथ उद्योगी हात २५

- थोड्या पैशाची पण वेळेवर मदत
- डोक्यावरलं दुकान
- सोताच्या हिंमतीवर
- उद्योगाच्या घरी लक्ष्मी......
- बाई मी उद्योग करीते

★ आम्ही गटाला वाढवलं ३३

- गटानं आम्हाला वाढवलं
- इथे गट जमतात
  - चावडीवर • मंदिर सर्वांना खुलं • आणि कुठं कुठं

★ गट पसरले गावोगाव ३९

- केल्यामुळे.... विश्वास वाढला
- मलाच माझी ओळख पटली
- गटानं दिली 'एक' व्हायला संधी...

★ गटाला वळण लागते तेव्हा ४५

- गट कोणाचा
- आंबवण्याची गोष्ट
- लोकशाहीसाठी
- जबाबदारी पहावी घेऊन
- गोष्टी बोलू शहाणपणाच्या चार

★ गट तसे गाव ५१

- आमची गटबाजी
- गटाची उचल गावाला
- ससेवाडी बदलाची कहाणी
- गटानं आणली गावात....
- गावाला लागलं गटाचं वळण
- आमची ताकद गटाची ताकद

★ नव्या दिशा ५९

- महिला बचत गट - एक माध्यम
- उद्योगी हाताला....
- जिजामाता प्रबोधन समिती
- बदलली दिशा राजकारणाची
- दिशा भांडवल गटाची
- पतसंस्था
- गटाची स्वयंपूर्णता

★ घडण संघटिकांची ६७

★ हे तर पहिलं पाऊल ६९

★ परिशिष्टे ७२

***

# प्रस्तावना

ज्ञान प्रबोधिनी ही संस्था ग्रामविकसनाचे काम पुणे जिल्ह्यातील भोर, वेल्हे, हवेली या तालुक्यात असलेल्या शिवगंगा, गुंजवणी नद्यांच्या खोऱ्यांमध्ये गेली ४० वर्षे करत आहे. महिलांसाठीच्या कामास सुरूवात करून साधारण १५ वर्षे झाली. ग्रामीण भागातील महिलांची आर्थिक व सामाजिक स्थिती सुधारल्याशिवाय विकासाचं गाडं पुढे जाणार नाही हे तेव्हाच समजलं होतं. दारूबंदी आंदोलन, स्वयंरोजगार प्रशिक्षण, निर्धूर चुली प्रकल्प, व्यक्तिविकास व नेतृत्व विकासाचे प्रशिक्षण असे विविध उपक्रम महिलांसाठी चालू होते. त्याद्वारे महिलांमध्ये मोठ्या प्रमाणावर जाणीवजागृती होत होती. वेचून वेचून एकेकीसाठी घेतलेले परिश्रम दिशा देणारे ठरत होते तरीही त्यामुळे घडलेले सामाजिक परिवर्तन टिकून राहाण्यासाठी पुरेसे वाटत नव्हते.

जून १९९५ मध्ये ज्ञान प्रबोधिनी संस्थेतर्फे महिलांसाठी शिवगंगा, गुंजवणी खोऱ्यात पहिल्या बचत गटाला सुरूवात झाली. अगदी साध्या, सोप्या आणि औपचारिक पद्धतीने पैशाचे व्यवहार करायच्या निमित्ताने ग्रामीण महिला बैठकीसाठी एकत्र जमू लागल्या. स्वत:साठी कधीही बाहेर न पडणाऱ्या अनेकजणी प्रथमच या निमित्ताने घराबाहेर पडल्या. त्यामुळे त्यांच्या जाणिवेच्या कक्षा रूंदावल्या. महिलांसाठी असणारी अनेक बंधने व त्यांच्या मर्यादा लक्षात घेऊनही, महिन्यातून एकदा होणाऱ्या बचत गट बैठकीमुळे व त्या निमित्ताने होणाऱ्या इतर उपक्रमांमुळे, महिलांच्या सुप्त गुणांच्या विकासाला आणि कर्तृत्वाला एक विधायक दिशा मिळाली. कमी शिक्षण, अपुरं व्यवहारज्ञान यामुळे कायमच मागे पडणाऱ्या महिलांसाठी, नियमित होणारी बचत गटाची बैठक ही एक शिक्षणाची पर्वणीच ठरली.

आर्थिक व्यवहाराच्या निमित्ताने साऱ्याजणी दडपणाशिवाय पैसे हाताळायला शिकल्या, स्वत:च्या हिंमतीवर पैशाचे व्यवहार करायला शिकल्याच शिकल्या पण त्या व्यवहाराची जबाबदारीही घ्यायला शिकल्या. त्यातून योग्य

व्यवस्थापन करायला, योग्य प्रकारे पैसे वापरायला, त्यासंबंधीचे निर्णय घ्यायला शिकल्या. घराबाहेर पडून नवनवीन स्वयंरोजगाराची कौशल्ये त्या शिकल्या. ती वापरून पैसे मिळवायलाही महिला शिकल्या. मुख्य म्हणजे घराचा उंबरा ओलांडायला स्त्रिया शिकल्या. घरचं बघून गावचं कसं करायचं तेही शिकल्या ...... या साऱ्यातून अनेकींच्या कंटाळवाण्या झालेल्या आयुष्यात नवीन तरतरी आली, उत्साह आला, त्यांचं सुनेपण गेलं आणि नवचैतन्य आलं! गट जरी व्यवहारासाठी सुरू झाले असले, आर्थिक फायद्यासाठी सुरू झाले असले, कुणा एकीच्या सांगण्यावरून सुरू झाले असले, बचत गटातून घडलेल्या बदलाची ताकद बघून सुरू झाले असले, सामाजिक गरज म्हणून सुरू झाले असले तरीही ते सारे गट आता या साऱ्या प्रक्रियेचा भाग बनले आहेत. एकटीला न करता येणाऱ्या अनेक गोष्टी साऱ्याजणी 'गटाच्या ताकदीमुळे' सहज करू लागल्या आहेत. त्यातून त्या स्वावलंबी बनत आहेत. या साऱ्या 'घडणी'मुळे बऱ्याच काळापासून वाट बघणारे मूलभूत सामाजिक बदल आता नजरेच्या टप्प्यात आले आहेत.

केवळ संधीची वाट पहाणाऱ्या महिलांसाठी प्रबोधिनीमुळे नियमित चालणाऱ्या गट बैठकींमधून पोषक वातावरण मिळाले, त्यांच्यातील सुप्त गुणांना प्रगट होण्याचे स्वातंत्र्य मिळाले व प्रबोधिनीतून व्यावहारिक मार्गदर्शन मिळाले. या साऱ्या गोष्टींमुळे समाज परिवर्तनासाठी लागणारं स्थानिक नेतृत्व आता हळूहळू तयार होतंय.

शिवगंगा, गुंजवणी खोऱ्यांत प्रबोधिनीने जाणीवपूर्वक केलेल्या या प्रयत्नांमुळे ही अशी प्रक्रिया अनेक गटांमध्ये, वाड्या-वस्त्यांवर, गावागावांमध्ये सुरू झाली आहे. ती स्थानिक पुढाकारामुळे रूजत आहे, पसरत आहे. त्यामुळे जागोजागी जमणारे हे गट नुसतेच व्यवहारापुरते मर्यादित राहिले नाहीत तर त्यातून एक सूत्रबद्ध अशी चळवळ उभी राहिली आहे. सप्टेंबर २००० पर्यंत म्हणजे केवळ सव्वापाच वर्षातच ४५ गावांमध्ये १७२ गटांमधून साधारण २८०० महिला या उपक्रमात सहभागी झाल्या आहेत.

असा सारा, ग्रामीण महिलांच्या आत्मप्रचीतीचा हा विलक्षण प्रवास आपण पानापानांमधून अनुभवणार आहोत.

***

## कहाणी घडण्याची

'कोणाची आहे ही कहाणी?' असा प्रश्न तुम्हाला नक्कीच पडलेला असणार. ही कहाणी आहे, तुमच्या आमच्या सारख्याच गावाकडच्या बायांची. ज्यांना शिक्षणाचं पाठबळ नाही की पैशाचं. घरी दारी उजाडल्यापासून निजेपर्यंत कष्ट करायचे, स्वत: चुलीचे चटके खाऊन घरच्यांचं पोट भरायचं अशांची.

घरातल्या बाईबद्दल एवढं सांगण्यासारखं काय असणार? आणि ते पण अख्खं पुस्तक भरून? असा विचार पडला का?

महिलांना एकदा खात्री झाली की त्या कुठलीही गोष्ट लगेच उचलून धरतात. सुरूवात झाली एका गावातल्या एका गटामधल्या २० जणींपासून आणि आता या उपक्रमात २८०० महिला १७२ गटांमधून एकत्र येतात. पैशाचे-पैशाबाहेरचे व्यवहार करतात. बघता-बघता गटांची संख्या इतकी वाढत गेली, की एकेका गावामध्ये ७-८ किंवा त्याहीपेक्षा जास्त गट बसायला लागले. वरवे गावात तर २२ गट आहेत म्हणजे गावातली घरटी बाई गटात आहेच म्हणा की. असा उपक्रम महिलांना आपला वाटल्याने रूजला. बचत गटाचा एवढा मोठा पसारा, तोलून सावरून धरलाय स्थानिक संघटिकांनी! आधी स्वत:च्या गटांचं मग गावांचं आणि मग चार गावांचं कामकाज पार पाडायला या संघटिका शिकल्या. एरवी चारचौघींसारख्याच, पण त्यांच्या धडपडीमुळं आणि तळमळीमुळं, बचत गटाची खरीखुरी ताकद बनल्या आहेत या महिला!

अनेक प्रकारच्या महिलांना गटांनी आधार दिला. तरूण सुनांना, कर्त्या-सावरत्या महिलांना, एकटी दुकटीला, तर कधी एकटी नवऱ्याच्या मागे, तर कधी नवरा असतानासुद्धा. या सगळ्याजणी स्वत: घडल्या आणि स्वत: घडताना त्यांनी स्वत:च्या घराला घडवलं. ५ वर्षांमध्ये गावा-गावातून,

घरा-घरामधून छोटे छोटे बदल घडायला लागले. मोठा बदल घडायला हवा असेल तर असेच छोटे बदल खूप मोठ्या प्रमाणावर व्हायला लागतात. तसं बचत गटामधून झालेलं दिसतंय.

काही ठिकाणी गावं सावकारीच्या विळख्यातून मोकळी झाली, गहाण पडलेल्या जमिनी सोडवल्या गेल्या, दुष्काळी शेतीला आधार झाला, हक्काची घरं झाली. कुणाच्या दावणीला गुरं आली, तर कुणाच्या घरात गॅस, नळ झाले. बायांचे कष्ट हलके झाले. पोरींच्या शिक्षणासाठी महिलांच्या हातात हक्काचा पैसा यायला लागला. महिला उद्योग करायला लागल्या.

पण हे सगळं अचानक नाही घडलं, महिलांनी बचत गटाच्या आधारानं ते घडवलं. ही केवढ्यातरी हिमतीची गोष्ट नाही का?

'बाया जमल्या म्हणजे निस्त्या कालवा करणार!' असं म्हणणाऱ्या गावकऱ्यांना **गटानं एकत्र आल्यावर महिलांची ताकद काय असते ते दिसलं.**

'बायांची अक्कल चुलीपाशी' असं म्हणणाऱ्या समाजाला **बायांची अक्कल कुठे-कुठे चालू शकते ते दिसलं.**

'मी बाईमानूस ! मला काय जमतंय ?' असं म्हणणाऱ्या **महिला ताठ मानेनं जगायला, स्वत:ला काय-काय जमू शकतं ते शोधायला शिकल्या.** समाजानं आणि स्वत:च घालून घेतलेली चौकट ओलांडायचं त्यांनी धाडस केलं. त्यामुळे अनेक जणींमध्ये उल्लेखनीय बदल झाले. त्यांची उदाहरणे आता त्यांच्या गावातल्या इतर महिलांसमोर आहेत. कुणाकुणाची उदाहरणं द्यायची?

शिवापूरच्या वनशिवबाईंना गटासमोर मान वर करून वाक्य ही बोलता येत नव्हतं, पण जेव्हा गटाचं बळ मिळलं, तेव्हा मेळाव्यातसुद्धा त्या ताठ मानेनं बोलू लागल्या.

'मला कोणीतरी समजून घेतं,माझ्या नडीला हक्काची मदत मिळते.' 'माझ्या शब्दाला कोणीतरी विचारतं.' म्हणून घराघरातल्या सरूबाई, पारूबाईला गटामुळे जगण्याची उभारी मिळाली. नवीन काही करण्याची हिंमत आली.

गटामुळे नव्या माहितीची देवाण-घेवाण होते, नव्यानं क्षितीजाची ओळख होते आणि त्यातून सुरू होतात उद्योग. उद्योग करायचा झाला तर त्यासाठी खूप भांडवल लागत नाही की शिक्षण लागत नाही! त्यासाठी लागते ती उद्योगसंधी शोधायची नजर आणि मग ती संधी स्वीकारण्याची, जोखीम घेण्याची ताकद! असा सांगावा देणाऱ्या गावोगावच्या उद्योजिका आपल्याला कधी त्या दिसतात हॉटेल चालवण्यातून हिंमत आणि मान मिळवणाऱ्या द्वारकाताई, तर कधी उद्योग कशाचा करायचा हे अचूक हेरणाऱ्या उषा आणि पद्मा गायकवाड, तर कधी बचत गटासाठी पिशव्या शिवता-शिवता आणि बचत गट प्रमुखांचे फोटो काढताना उद्योगी बनलेल्या भारतीताई, माहेरी परतून आलेल्या आशाताई, गावात महिलांची ताकद निर्माण व्हावी म्हणून उत्साहानं प्रयत्न करायला पुढे सरसावतात तेव्हा त्यांची हरवलेली हिंमत परत मिळते आणि स्वत:ला घडवता-घडवता त्या संघटिका होऊन काही गावांचा कारभार सांभाळायला शिकतात.

त्यातून आपल्या गटाची जबाबदारी पाहता-पाहताच, अजून दहा गटांची, एवढंच नाही तर इतर गावांची जबाबदारी सांभाळणाऱ्या आशाताई, सीमाताई, गंगूताई, बायजाताई, सुनीताताई यांच्यासारख्या संघटिका गावा-गावातून उभ्या राहिल्या. 'माझ्या घरचं तर मी बघणारच, पण बचत गटाचा कारभारही पेलणार' अशा जिद्दीनं काम करणाऱ्या गावोगावच्या महिला हीच बचत गटाची लाखमोलाची ठेव.

गटाच्या पातळीवर बघितलं तर दिसतं, की गटा-गटातल्या महिला जशा बदलल्या तशा वाढल्याही. महिला वाढल्या तसे त्यांचे गटही वाढले. 'संस्थेतून गट घ्यायला कुणी कार्यकर्ती गेल्याशिवाय, गट व्यवस्थित होत नाही' अशी परिस्थिती बघता-बघता पालटली आणि शिस्तीनं, समजूतीनं व्यवहार करणारे गट आता नवलाईची गोष्ट राहिली नाही.

गावात किती तरी वेळा अशा महिला असतात की ज्यांना काहीतरी चांगलं करायचं असतं, पण नक्की काय ते कळत नसतं. मनात कल्पना असल्या तरी साथ मिळत नसते. गटाच्या रूपानं अशा महिलांना ही संधी मिळाली.

वरवे गावच्या बचत गटाची ताकद निर्माण करणाऱ्या उज्वलाताई, रहाटवडे गावातल्या कितीतरी महिलांच्या अडीनडीला धावणाऱ्या शांताबाई, ही याची उत्तम उदाहरणे.

या सगळ्या घडामोडींचे पडसाद गाव पातळीवर उमटले नसते तरच नवल. गावात महिलांची एकत्र ताकद उभी राहू शकली. आता तर अपवादात्मक ठिकाणी गाव गटांकडे आधारासाठी यायला लागलं आहे. आता जवळपासच्या तीनचार गावातल्या महिला मिळून भागावर काही परिणाम घडवण्याचा प्रयत्न करू लागल्या आहेत.

गावातली जात-पात, गरीब-श्रीमंत ही बंधनं हळूहळू सैल होऊन गावातलं वातावरण बदललं. काही गावांमध्ये तर गावच्या महिलांनी गावच्या राजकारणाची दिशा ठरवली. गावपातळीची हळूहळू समीकरणं बदलायला लागली आहेत. यामुळेच महिलांच्या राखीव जागांसाठी चांगले पर्याय उभे राहात आहेत.

आपल्या मैत्रिणी कशा घडल्या हे वाचताना, त्यांची धडपड समजून घेताना, आपल्यालाही अशी धडपड करण्याचं बळ यावं, म्हणून केलेला प्रयत्न म्हणजेच हे पुस्तक! आणि अशा कितीतरी महिला आणि गट , ज्यांची नावे यांत नाहीत असे गावा-गावातून शिकतायत आणि शिकवतायत. ही तर त्यापैकी काही केवळ हिंमतवान महिलांची, बहाद्दर गटांची तोंडओळखच ! करूया तर मग फेरफटका या गटांचा.........

***



## गटाचं तंत्र

**❋ गट कशासाठी करायचा ?**

- स्वत:ला आणि अशाच काहीजणींना हक्काचा पैशाचा आधार मिळावा, एकमेकींच्या आधारानं पुढं जायला मिळावं म्हणून.
- गटाच्या आधारानं स्वत:ला, स्वत:च्या घराला, गावाला सुधारायची संधी मिळावी म्हणून.
- ताठ मानेनं जगण्याची, नव्या नव्या गोष्टी शिकण्याची उभारी मिळावी म्हणून

**यासाठी गट करायचा.**

**❋ किती जणींचा हा गट करायचा?**

एकमताच्या **कमीत कमी ५** किंवा जास्तीत **जास्त २० जणी** जमल्या की गट झाला. जर सभासद २० पेक्षा जास्त जमले, तर कायद्याप्रमाणे गटाची नोंदणी करावी लागते.

२० किंवा २० पेक्षा कमी असला की महिलांचा गट, नोंदणी न करताही सर्व व्यवहार करू शकतो. गटाच्या नावाने बँकेत खाते सुद्धा काढू शकतो.

**❋ कोणी, कसा गट चालवायचा असतो?**

**गटाची जबाबदारी सगळ्यांचीच.** सर्व प्रथम गटाला जमलं की सर्वांनी मिळून गटाचं नाव ठरवायचं, वेळ, तारीख ठरवायची. गटात जमणारी रक्कम घेणं, मोजणं, नोंदवणं ही सगळी व्यवहाराची कामं करायला गटप्रमुख म्हणून गटातल्या तीन जणी निवडायच्या. त्यांना मात्र लिहिता वाचता यायला पाहिजे. म्हणजे व्यवहार नीट होतात. पण मुख्य म्हणजे

गट सगळ्यांनी मिळून एकमताने चालवायचा.

*** गटात किती रक्कम भरायची?**

**हे गटानंच ठरवायचं.**

प्रत्येकीला परवडेल अशी, आपल्या ऐपतीनुसार **बचतीची** रक्कम ठरवून, **दरमहा जमा करायची**. एखाद्या गटाची बचत दरमहा २० रुपये असेल तर, एखाद्या गटाची दरमहा २५ रुपये. शिवापूर भागातल्या काही गटांची तर रुपये ५० किंवा रुपये १०० अशीसुद्धा बचत आहे. पण गटातील **सगळ्यांची बचत सारखी पाहिजे.** म्हणजे अधिकारही सारखाच राहतो.

*** गटात जमलेल्या रक्कमेचे काय करायचे ?**

गटात जमलेली रक्कम, गटाला वळण लागलं म्हणजे गटातल्याच सभासदांपैकी जिला हवी असेल तिनं उचलायची. म्हणजे **अर्थसाहाय्य (कर्ज)** घ्यायचं. **कशासाठी हवं, किती हवं ते अर्जावर लिहून द्यायचं.** गटाच्या नावानं **तारण** म्हणून घरातील स्वत:च्या मालकीची वस्तू लिहून द्यायची. परतफेडीसाठी गटातल्या दोंघींना जामीन रहायला सांगायचं. कोणाला किती अर्थसाहाय्य द्यायचं हे गटातल्या सगळ्यांनी मिळून ठरवायचं. जिची गरज जास्त तिला आधी रक्कम द्यायची. त्यासाठी आपापसातली भांडणं विसरायची तयारी हवी. गटात सगळ्या जातीच्या, सगळ्या परिस्थितीतल्या महिला सारख्याच. कुणी मोठी नाही की कुणी लहान नाही.

*** घेतलेल्या अर्थसाहाय्याची (कर्जाची) परत फेड कशी करायची?**

अडीनडीला सभासदांना आधार मिळावा म्हणून गट चालतो. **अर्थसाहाय्याची परतफेड कशी करायची तेसुद्धा गटानं एकमतानं ठरवायचं.** परतफेडीचा किती हप्ता ठरवायचा त्या विषयी आधी नियम करायचा. उदाहरणार्थ ५०० रुपये अर्थसाहाय्य घेतले तर दरमहा १००

रुपये अशी ५ महिन्यात मुद्दलाची फेड करायची. त्याशिवाय गटाने आर्थिक सेवा शुल्काचा (व्याजाचा) दरही ठरवायचा. दरमहा २% किंवा ३% असा म्हणजे, ५०० रुपये अर्थसाहाय्य घेतले तर पुढील महिन्यात २% दराने रुपये १० सेवाशुल्क जमा करायचं. जसं गट ठरवेल तसं. सेवाशुल्क दर (व्याजदर) आपल्याला बोजा होणार नाही, असा हवा.

**✽ ही व्यवहाराची रक्कम कोणाकडे व कधी द्यायची?**

त्यासाठी गटांतल्या सगळ्यांनी मिळून सर्वांना **सोयीचा महिन्याचा ठराविक दिवस व ठराविक वेळ ठरवायची. कुठे जमायचं ते ठिकाणही ठरवायचं** आणि सगळ्याजणी जमल्यावर **सगळ्यांसमोरच ते व्यवहार करायचे.** काळजीने सर्वांनी वेळ पाळायची. कोणी कोणाकडे आधी पैसे द्यायचे नाहीत की मागाहून देवाण घेवाण करायची नाही. सर्व व्यवहार सर्वांसमोरच झाले पाहिजेत.

**✽ मोठी रक्कम अर्थसाहाय्य म्हणून हवी असेल तर कशी मिळायची?**

बचत गटांचा कारभार चोख असेल आणि आर्थिक सेवाशुल्काचा (व्याजाचा) दर कमी असेल तर **बँकांकडून गटाच्या नावावर मोठ्या रकमेची कर्जे मिळू शकतात.** आपल्या या काही गटांनीसुद्धा बँकेकडून उद्योगासाठी कर्ज घेतलेलं आहे. आणि आता तर गट सुरू झाले की, गटाच्या नावानं बँकेमध्ये खातंच उघडतात, म्हणजे दर महिन्याला जमणाऱ्या रकमेपैकी काही रक्कम गटाच्या नावाने बँकेत जमा करता येते व बँकेतून कर्ज प्रकरण करता येते.

**✽ गटामधल्या व्यवहाराची नोंद कशी होते?**

खरे तर गटाचे व्यवहार विश्वासाच्या आधारावरच चालतात, तरीही कुठलाही घोटाळा होऊ नये म्हणून गटातल्या व्यवहाराच्या नोंदी असतात. प्रत्येक सभासदाकडे तिने गटात केलेला व्यवहार नोंदवलेले **सभासद पुस्तक** असते. हे पुस्तक **बैठकीच्या वेळीच भरले जाते.**

त्याशिवाय गटातल्या २० जणींच्या नावावरचा महिन्याचा व्यवहार **जमाखर्च पत्रकात** लिहिलेला असतो. त्याची कार्बन प्रत काढली जाते. एक प्रत गटात राहाते व एक प्रत प्रबोधिनी मध्ये जमा केली जाते.

याशिवाय गटातल्या प्रत्येकीचा व्यवहार **सभासद खाते वहीमध्ये** असतो. याचा हिशोब संघटिका बघतात.

५ वर्षाच्या गटाच्या व्यवहारासाठी लागणारे हे अर्थसाहाय्य अर्ज, सभासद पुस्तके, खातेवही हे सगळं ठेवण्यासाठी मापाची पिशवीही असते. संस्थेतून हे साहित्य गटास मिळते. त्यासाठी गटाने रुपये ५००/- **सभासदत्व शुल्क** जमा करायचे असते.

**✻ गट नोंदींसाठी काही इतर खर्च येतो का?**

गटाच्या अडचणी सोडवण्याचं आणि गटाचे हिशोब तपासण्याचं जोखमीचं काम संस्था करते. त्यासाठी संस्थेला येणारा खर्च प्रत्येक गट दरमहा काही वर्गणी काढून भरून देतो. याला प्रबोधिनीत संघनिधी म्हणतात. कोणतीही गोष्ट फुकट घ्यायची किंवा आपल्या गरजेसाठी आपण काहीच किंमत द्यायची नाही, असं न करता, बचत गट, त्यांच्यासाठी केलेल्या कामाची ही रक्कम समजून उमजून जमा करतात.

**✻ बँकेत-पोस्टात सुद्धा बचत करता येते मग गटामध्ये असं काय वेगळेपण आहे?**

तर महिलाच सांगतात हे वेगळेपण.

महिलांच्या बचत गटामध्ये -
- कागदपत्रांची कटकट नाही.
- बाईमाणसाला समजेल असा कारभार.
- गावकी नि भावकीतल्या बायांसोबत विश्वासाने होणारा व्यवहार
- अडीनडीला हक्काचा मिळणारा पैसा मिळतो.

- गटात आलं म्हणजे गटाचा आधार वाटतो.
- पैशाचा व्यवहार कळायला लागतो.
- चार चौघात कसं वागायचं ते समजतं.


## ✻ नियम

असा चालतो या बचतगटांचा कारभार. हा कोणाच्या तरी मर्जीवर चालणारा बेशिस्त कारभार नाही. महिलांनीच स्वतःच घालून घेतलेल्या नियमांनी या कारभाराला शिस्त आली आहे.

**काय आहेत हे नियम?**

- दर महिन्याच्या गटाच्या बैठकीला सर्व जणींनी नियमितं यायचं.
- ठरलेल्या ठिकाणी, ठरलेल्या वेळेला हजर राहायचं.
- बचत आणि परतफेडीचा हप्ता वेळेवर भरायचा.
- गटाच्या कारभारात प्रत्येकीनं लक्ष द्यायचं.
- आणि जर हे जमलं नाही तर दंड भरायचा.

✻✻✻



# मी परावलंबी नाही

मी माझ्या पायावरती ही उभी नव्याने बाई
मी परावलंबी नाही, मी परावलंबी नाही ।।धृ ।।

या जिण्यास बाईच्या गं हे दळीत होते जाते
माझ्याच घराच्या आत मी बंदिवान का होते?
मी मुक्या गुराच्यावाणी या घरात जखडुन होते
मी कधीच नव्हते बाई ओलांडुन गेले जोते
पण कुणा ठावकी कैशी मी बदलुन गेले बाई ।।१ ।।

घर शेतकऱ्याचे माझे, कर्जाचे झाले ओझे
घरधनी दीनवाणा हा, घर सावकार हा मागे
पिऊनिया धुंद हा बाप्या, शेतात राबते बाई
पोरांची सुटली शाळा, कनवटीस कवडी नाही
इज्जतीत घर राखाया मी बचत गटाला जाई ।।२ ।।

ही इथून मागे सारी बाप्यांची दुनिया होती
बाईला व्यहाराची माहितीच कसली नव्हती
जरि इथली झाशीवाली, इंदिराबाई ही इथली
तरी घरोघरी एकाकी भारतीय महिला दबली
शिकुनिया मात्र ही आता पुरुषांच्या पुढती जाई ।।३ ।।

दुनियेच्या पोटामध्ये लई उलथापालथ झाली
कुणि राजा उरला नाही कुणि गुलामदेखील नाही
मांडीला लाऊन मांडी पाटलास धनगर बोले
समद्यांना समदे रस्ते आताच खुले ग झाले
जनतेची आली सत्ता बोलती जाहली बाई ।।४ ।।

मोलाने राबुन रोज मी कवडीकवडी केली
दरमहा वाचवुन पैसे मी गटात शिल्लक केली
हा मैतरणींचा मेळा मज रोज देतसे धीर
उद्योग नवे मी शिकले, अन्याय रोखले पार
मी पती, मूल, घर, गाव या साऱ्यांची उतराई ।।५ ।।

## गट कसे चालतात ?

### गटामध्ये नियम असे ठरले......

घरकामातून, मोलमजुरीतून, शेती- भातीतून सवड काढून महिला गटबैठकींसाठी जमायला लागतात. गटाचे सगळेच व्यवहार नव्याने शिकतात. एकमेकींच्या आणि संस्थेच्या मदतीनं त्या हळूहळू एक - एक गोष्ट समजून घ्यायला लागतात, गटाला हळूहळू एक आकार यायला लागतो. जरा गटा-गटातून फिरून बघूया बरं काय समजून घेत आहेत आणि काय काय ठरवत आहेत आपल्या मैतरणी.

### सेवाशुल्क किती भरायचं?

डोंगराच्या कुशीतलं हे कुसगाव. नव्यानेच सुरू झालेला गट. गटात १८ जणीच आहेत. प्रत्यकीचे २५ रुपये असे एकूण ४५० रुपये जमलेत. जिजाआजीला उचल पाहिजे. उचल घ्यायची म्हणजे ती फेडायची कशी हे ठरवायला पाहिजे. गावकीच्या फंडामुळे कर्ज फेडताना कर्जाच्या रकमेबरोबर रक्कम वापरल्याबद्दल सेवाशुल्क पण द्यायचं हे सगळ्यांना माहित होतंच. संस्थेच्या ताईंनी विचारले, “सेवाशुल्काचा दर किती ठेवायचा?” काहीजणी गप्प बसल्या. काहीजणी म्हणाल्या, “तुमीच सांगा, आमाला काय कळतंय त्यातलं” ताईंनी विचारलं.

पैसे जमा कोण करतं - आम्ही.

उचल कोण घेणार - आम्ही.

फेड कोण करणार - आम्ही.

मग सेवाशुल्काचा (व्याजाचा) दर कोण ठरवणार ?

आता महिला विचार करायला लागल्या.

एक म्हणाली 'सावकारासारखाच दर म्हणजे ५० रुपये ठरवूया.'
'म्हणजे?' ताईंनी विचारले,

'५०० रुपये उचललं तर फेड पुरी होईस्तोवर दर महिन्याला ५० रुपये भरायचं" ताईंनी हिशोब केला आणि विचारलं 'म्हणजे दर १०० रुपयाला १० रुपये महिन्याला म्हणजेच १० टक्के दरमहा? हा दर सावकारा एवढाच झाला. गटात येऊन सेवाशुल्काचा बोजा व्हायला लागला तर कसं व्हायचं?'

'ह्ये बी खरंच. मंग सावकार नाय तर फंड आन् गटात फरक काय ऱ्हायला?'

'म्हंजे आपला दर कमी पायजे. बोजा होनार नाही असा.' आणि बोलण्या-बोलण्यातून शेवटी सगळ्यांनी सेवाशुल्काचा दर ठरविला महिन्याला ३%- म्हणजेच, दर १०० रुपये मागे दर महा ३ रुपये! आणि ठरवलं की जशी जशी मुद्दल फिटेल तसं ते बी कमी कमी व्हायला पायजे. सेवाशुल्काचा दर ठरला, कसं आकारायचं ते सुद्धा ठरलं.

तर, गटातले लहान- मोठे निर्णय आपणच घ्यायचे असतात.

## सेवाशुल्काचा दर बदलला

रांझे गावात एकूण ५ गट सुरू झाले. गावातल्या इतर सगळ्या गटांमध्ये सेवाशुल्काचा दर होता दर महा २% किंवा ३%, म्हणजेच १०० रुपये मागे २ किंवा ३ रुपये पण एका गटात मात्र सेवाशुल्काचा दर ४% होता. गटातल्या काही मंडळींना हा दर जास्त वाटतच नव्हता. कारण त्यांना वाटायचं की पैसे उचलायची गरज आपल्याला कशाला पडतीय, तेव्हा बाकीच्यांना जरी दर जास्त वाटला तरी विचार कशाला करायचा? आणि गटातल्या बाकीच्या सदस्या त्यांच्या दडपणामुळे बोलल्या नाहीत. त्या आपली कशाबशा फेड करायच्या. थोड्याच दिवसांनी त्या मंडळींवर अर्थसाहाय्य घ्यायची वेळ आली, तेव्हा मात्र

सेवाशुल्काचा दर जरा जास्तच आहे असं त्यांना वाटायला लागलं ! आणि त्यानंतर त्यांच्याही गटात सेवाशुल्काचा दर कमी करायची बोलणी त्यांनी सुरू केली, अर्थातच सेवाशुल्काचा दर सगळ्यांना परवडेल असा महिन्याला २% ठरला !

स्वत:पुरतेच पाहाणाऱ्या सगळ्यांनाच या उदाहरणानं धडा मिळाला. गटातला **प्रत्येक निर्णय हा कुणा एकीचा नव्हे तर सगळ्यांच्याच फायद्याचा हवा!** आणि एकदा नियम केला की झालं असं नाही तर सगळ्यांच्या विचारानं तो बदलताही येतो. अशाच छोट्या मोठ्या प्रसंगातून गटाची समजूत वाढत असते. त्यासाठी गटानं स्वत:लाच शिस्त लावून घ्यावी लागते.

## वेळेची किंमत

ससेवाडीच्या एका गटात ठरलं की बैठक दर महिन्याच्या ८ तारखेला बरोबर रात्री ९ वा. सुरू करायची. घरातलं सगळं आटपून यायला सगळ्या बायकांना ही वेळ सोयीची होती. पण बघावं तर एकाही बैठकीला २० च्या २० जणी काही वेळेवर येईनात, त्यामुळे वेळेवर येणाऱ्यांचा खोळंबा व्हायचा आणि उशीरा येणाऱ्यांना गटात काय चाललंय ते कळायचं नाही . म्हणून आपसात बोलून त्यांनी यावर तोडगा काढला की बैठकीला १० मिनिटांपेक्षा उशीरा येणारीनं १ रुपये दंड भरायचा. असा नियम केला तेव्हा मात्र वेळ लक्षात ठेवायची किंमत १ रुपये ठरली. तशी सगळ्यांनाच बैठकीची वेळ पक्की लक्षात राहायला लागली, आणि गट बरोबर ९ वा. सुरू व्हायला लागला !

## गुंतवणुकीसाठी सेवाशुल्क दर कमी हवा

गावात गट सुरू झाला तेव्हा गटात अर्थसाहाय्य किती टक्क्यानं द्यायचं हे ठरत होतं. गटानं एकमुखानं ठरवलं ४% दरमहा, कारण गावात

किरकोळ कर्ज ७ ते १०% दरमहा दरानं मिळत होतं. खरं तर हा दर २ किंवा ३ टक्के असायला हवा होता. पण त्या गटाला काही पटत नव्हतं. शेवटी निर्णय गटाचा होता. दर ठरला दरमहा ४% गट सुरू झाला,उलाढाली सुरू झाल्या. सगळी अर्थसाहाय्य हातउसनी सारखी वाटप व्हायची. कारण सेवाशुल्क दर परवडायचा नाही. मग एका उदाहरणातून पटवलं की महिन्याला ४ % म्हणजे दोन वर्षात मुद्दलीइतकं व्याज होते. पण कशातही रक्कम गुंतवली तरी दोन वर्षात १०० रुपयांचे २०० रुपये होत नाहीत म्हणजेच १०,००० रुपयांची म्हैस घेतली तर मुद्दल दुग्ध व्यवसायातून फिटायला कमीत कमी साडेतीन वर्ष तरी लागतात. मग म्हैस खरेदीसाठी गटाचा दर कसा परवडायचा? यावर चर्चा झाली. रक्कम गुंतवायची असेल तर दर कमी पाहिजे हे हळूहळू पटू लागलं. मग मात्र ४% चा १ वर्षांनी ३ % झाला. २ वर्षांनी अजून कमी होऊन आता २% झाला. त्यामुळे गरजेच्या कामासाठी सुद्धा महिला गटातून पैसे उचलायला लागल्या, कारण हा दर परवडायला लागला. विहिरीच्या इंजिनसाठी उचलले पैसे तरी वर्षा-दोन वर्षाच्या पिकानं फिटू लागले. त्यामुळे गटातून मिळणाऱ्या पैशाच्या विश्वासावर लोक गुंतवणूक करू लागले.

## स्वत:ला मुरड घालायची, अळीमिळी गुपचिळी सोडायची !

गटामुळं एखादी गोष्ट करायचं दडपण येतं. म्हणजे जसं मिसरी लावणं हे वाईट आहे असं माहीत असतं पण सोडणं जमत नाही. अशावर वेल्ह्याच्या तोरणा बचत गटानं चांगला उपाय काढला. तोरणा बचत गटाची बैठक रात्री जेवल्यावर व्हायची, तेव्हा तर मिसरीची तल्लफ फारच यायची. सगळ्याजणी मिसरी लावून यायच्या. मग गट चुपचाप कुणीच तोंड उघडायचं नाही. काहींना हे पटेना. आणि जिच्या घरी बैठक व्हायची तिचं घर पार 'काळं' होऊन जायचं. मग गटात त्यावर चर्चा झाली आणि

मनाला थोडी तरी मुरड घालायची ठरलं. म्हणून गटानं नियम केला की मिसरी लावून गटाला आलं तर १ रुपये दंड. "सुरुवातीला मिसरी लावणं थोडी कमी करू" असं म्हणत निदान एक दिवस तरी एक तास तरी लावू नकोया, मग जमेल हळूहळू. असं म्हणत एकटीनं ठरवून न जमणारी गोष्ट गटामुळे करायचं साऱ्यांनी ठरवलं.

## जामीनदाराची विश्वासाची हमी

'व्हय मला या बी खेपंला उचल पायजे. दुसऱ्या कोनाला नको असंल तर जमलेली रक्कम मी उचलू का?'

सरूबाईंचा प्रश्न ऐकून गट जरा विचारात पडला. गट सुरू होऊन सहा महिने झाले होते. तिसऱ्या महिन्यात पहिलीच उचल सरूबाईंनी घेतली होती. आणि आता पुन्हा तिलाच उचल घ्यायची गरज होती. पहिल्या उचलीची फेड ती नियमितपणे करत होती. गटातल्या कुणाचीच तिनं उचल घ्यायला हरकत नव्हती. पण गटात जमलेली सगळी रक्कम एकीकडेच ठेवणं बरं नाही, म्हणून गटात चर्चा झाली 'अवं ताई, तिचा झेंडू शेतात उभा हाय, १५ दिसावर दसरा आला. फुलं उमलाया नको? त्याला खत लागतं, म्हनून तिला पैसे हवं. देवू या की तिला' भामाबाई, सरूबाईंची शेजारीण म्हणाली.

'व्हय, मी पुढच्याच महिन्यात सगळी फेड करेन', सरूबाई धीर येऊन बोलली. मग प्रश्न आला. 'जामीन कोण राहाणार?' यावर जरा शांतता पसरली. मग भामाबाईच म्हणाली- 'हजार, पाचशे कुठं घेऊन बसलात? हिचं शेत माझ्या दारात आहे. झेंडू गेला की त्याची पट्टी मीच घेईन ताब्यात. मी ऱ्हाते जामीन, सगळ्या रकमेला.' सरूबाईंचा प्रश्न सुटला. अडीनडीला लागते ती हक्काची मदत आता गटातूनच मिळायला लागली. झेंडूला खत मिळालं -मळा बहरला ! सरूबाईंची उमेद त्यापेक्षा दसपटीनं वाढली. **गोष्ट फक्त सरूबाईंचा मळा बहरल्याची नाही, तर**

**गटात तिला मिळालेल्या विश्वासाची!**

गटाच्या व्यवहाराला जामीनदार अशीच हवी की जी घेतलेले अर्थसाहाय्य योग्य प्रकारे कारणी लावते ना? हे काळजीनं बघते, त्या रकमेची जबाबदारी स्वीकारते.

गट सुरू झाला की सुरूवातीला असं कुणाला कुणी जामीन राहायला तयार नसतं, ती मोठी जोखीम वाटते. अर्थसाहाय्य घेणारी सभासद बळे बळे कुणाला तरी जामीन राहायला लावते. पण गटात व्यवस्थित फेड होऊ लागल्यावर मात्र एकमेकींच्या व्यवहारावरचा विश्वास वाढतो.

गट चालतात ते महिलांना एकमेकींबद्दल असलेल्या या विश्वासावर, हा विश्वास हेच गटाचं खरं धन. हाच या गोष्टीचा सांगावा.

***

## वेळेवर परत फेड झाली तर.....

बचत गट सुरु झाला की ३ महिने फक्त बचत जमा करावी. प्रमुखांची नावे नक्की झाली की गटाच्या नावाने बँकेत खाते उघडावे. त्यात बचतीची रक्कम जमा करावी. ३ महिन्यांनंतर अर्थसाहाय्याचे व्यवहार सुरु करावेत. सुरुवातीस महिलांना उलाढालीचा पुरेसा शिश्वास नसतो. त्यामुळे अर्थसाहाय्याची मर्यादित घातल्यास चांगले. उदा.प्रत्येकी रुपये ५०० पर्यंत. असे केल्यास **अनेकींना लवकर अर्थसहाय्य मिळते.** गटातल्या ५०% पेक्षा जास्त जणींना आर्थसाहाय्य मिळाले व ते **व्यवस्थित परतफेड होऊ लागले की गटाचा विश्वास वाढतो यासाठी वेळेवर आणि ठरल्या प्रमाणे केलेली परतफेड होणे हे सर्वांत महत्त्वाचे आहे. त्यामुळे तांत्रिक दृष्ट्या गट लवकर स्वयंपूर्ण होतो.**

**अधिक तपशील – परिशिष्ट १, पान ७२**

## गटात आले म्हणून बाई सारं बदललं.....

### माझ्या नावावरचं पैसं

'ताई माझं पुस्तक बघून मला हिशोब सांगा किती जमलं ते.' ताईंनी हिशोब केला आणि सांगितलं '७ महिने २५ रुपये प्रत्येक महिन्याला म्हणजे जमलेत १७५ रुपये' तान्हुबाईंच्या डोळ्यात पाणी आलं. आज इतकी वर्ष संसार केला, पण माझ्या हातात भाजीच्या २० रुपयापेक्षा जास्त पैसं कधीच आले नाय. गुपचुप साचवलेल्या पैशाला कधी पाय फुटायचे कळायचं बी नाय. बघता बघता एवढं साठलं, हेच खरं आधाराचं म्हणायचं.

पुस्तकातल्या या १७५ रुपयापेक्षा तान्हुबाईसाठी गटामुळं मिळालेला हक्काचा आधारच जास्त मोलाचा.

गटात येण्यानं महिलांना हळूहळू स्वत:ची जाणीव व्हायला लागली. जगण्याचा, काहीतरी करण्याचा हुरूप वाढला.

### आता मला नीटनेटकं राहावसं वाटतं

वेल्हे तालुक्यामधल्या सर्व बचत गटाच्या प्रमुखांची बैठक दर महिन्याला होते. साऱ्याजणी आपापल्या गटात काय झालं ते सांगायला येतात. एका गटप्रमुखांच्या बैठकीला हिराबाई चांगल्या तास-दीडतास उशीरा आल्या. एकीनं विचारलं, "काय हिराबाई, बैठक तर संपली, एवढा उशीर कशापायी? आवरून झालं नाही का?" यावर हिराबाईंची सोबतीण म्हणाली" आवरून झालं होतं तर काय. पन हिचं नखरंच. निस्तं बाजारला यायची असती तर एवढ्या वेळात चार बाजार करून आली असती." हिराबाई यावर गालातल्या गालात हसून म्हणाल्या "खरंच ताई, मी

आवरत हुते म्हनून मला येळ झाला. आतापातुर कधी असं वाटलंच नव्हतं बघा, पन बैठकीला यायचं म्हणजे चारजणीत यायचं, तवा वाटलं चांगली डोई विंचरावी, चांगलं लुगडं नेसावं.जरा पावडर लावावी. तसं आवरून मग म्या निघाले, गटात यायला लागल्यापासून वाटतंया काय तरी करावं.पुढारपण शिकावं, गटात यायला लागले, तशी नवीन काहीतरी करायचा लई उल्हास वाटतो बगा. आतापोतुर कुनाची साथ बी न्हवती, अन् कुनाचा आधार बी."

साथ नाही, आधार नाही म्हणून काही करता येत नाही असं वाटणाऱ्यांना जेव्हा ती साथ, तो आधार मिळतो, तेव्हा त्यांची आयुष्यच बदलून जातात.

## माझी नवी ओळख

"आज १८ वरसं झाली मालकासंग संसार करून. पन मला कधी हिंमत नव्हती झाली इचरायची, की दुधाचं किती पैसं आलं ? आज माझ्या नावावर उचल घेऊन ही म्हैस घेतलीया म्हणून ही हिंमत आली.आतापोतर तीन म्हशी मालकांनी आणल्या. त्या म्हशींचं चारापाणी मीच बघते पण त्या माझ्या वाटायच्या नाहीत, या म्हशीचं तसं नाय. माझ्या नावावर पैसे उचलून ही म्हैस घेतलीया, म्हनून ही म्हैस, मला माझी वाटतीया, ती माझ्या हौसेची म्हणून तिचं नाव ठेवलया हौसा" ससेवाडीतल्या रंजाबाईंच्या घरात गटामुळं नुसती म्हैसच आली नाही, तर रंजाबाईंचा स्वतःसाठीचा सन्मानही, त्या जोडीनं आला.

## गटानं मला बळ दिलं

"चार वर्षांपूर्वी मला धड तीन- चार वाक्यंसुद्धा बोलायला जमत नव्हती. काय बी जमत नव्हतं. आता तुम्हीच बघताय केवढा फरक पडलाय तो."

शिवापुरात राहणाऱ्या जिजामाता बचत गटाच्या शकुंतला वनशीव गावात भरलेल्या ५० जणींच्या महिला मेळाव्यात सांगत होत्या.

'चार जणीत बोलायचं म्हणजे धडधडतं' असं आपल्या पैकी किती जणींना होतं, मग वनशिवबाईंना एवढं धिटाईनं बोलायला कसं काय जमलं?

वनशिवबाई सांगतात, 'गटानं मला बळ दिलं.'

गटानं बळ दिलं म्हणजे काय? कसं काय मिळालं ते वनशिवबाईंना?

"धंद्यासाठी माझे मालक या गावी इकडे आले. अन् त्यांनी धंदा सुरू केला. आमची ना शेती-वाडी, ना घरचं दुसरं कोणी कमावणारं. पोरं लहान अन तशात आमी खालच्या जातीचं. गरिबी येवढी, का कुनाकडून १० रू. उसनं आणायची सुद्धा हिंमत नव्हती अन् ऐपत बी! असल्या परिस्थितीत कसची बचत नि कसचं काय?

माझं कुणाकडच येणं-जाणं न्हवतं. घराबाहेर तशी पडतच न्हवते. शेजारणीनं आग्रह धरला, म्हणून येका बैठकीला गेले. तशी मनातून हिंमत नव्हतीच पन बघितलं तर माझ्या सारख्या परस्थितीतल्या महिला पन आल्या होत्या. ताईंनी गटाचे सगळे नियम समजून दिले, त्यामुळे थोडा विश्वास यायला लागला. यरवी आम्हाला उचल कोण देणार? पण गटात आल्यावर कळलं, की गटातून कोणती पण नियमितपणे येणारी महिला उचल घेऊ शकते. आमच्या धंद्यामध्ये तर उचल घ्यायची फार गरज होती. पहिली उचल घेतली. २०००रुपयांची. आमच्या गटात समजूत चांगली. अडवणूक कोणीच केली नाही. गटाचा आधार नसता, तर मालकांच्या धंद्यात ऐवढी मदत करता आली नसती, त्याचबरोबर मग घरात गॅस घेतला, नवीन पलंग केला, स्वतःसाठी गंठण केलं. मी गटात गेले म्हणून धंद्याला हक्काचा आधार मिळाला. म्हणून तर बचतीचा हप्ता घरच्याकडून हक्कानं मागून घेते."

म्हणजे शकुंतलाबाईंना बळ मिळालं पैशाचं.

"हा निसतं पैशाचं नका म्हणू, अवं गटात जायला लागले म्हणून जशी उचल हक्कानं घ्यायला लागले, तशी जामीन बी राहायला लागलेच की . एरवी माझ्या शब्दाला कुणी विचारलं तरी असतं का?"

म्हणजे पैशाच्या जोडीनं शकुंतलाबाईंना विश्वास मिळाला की, माझ्या शब्दाला किंमत असेल, असं हक्काचं ठिकाण आहे.

"इस्वास तर कितीक गोष्टींचा मिळाला. आता हेच बघा. गटात यायच्या आदुगर पैशाचा व्यवहार बघायची येळच आली नव्हती. पण गटातून दर खेपेला उचल घेत गेले, तशी हजाराच्या रकमा बी हाताळायला यायला लागल्या. मी कमीत-कमी १०-१५ हजाराची रक्कम तरी हाताळली असंल."

"पैशाचा आधार मिळतो. तसा बचत करायचा उल्हास बी वाढतो. आणखी बचत करावी असं वाटायला लागतं." आता तर मी २००रुपय हप्त्याच्या भांडवल गटाला पण जाते.

"मी गटाची बैठक होता-होईतो चुकवली नाही. आपलं पुस्तक भरायला, गटात काय होतं ते समजून घ्यायला प्रत्येकानं गटाला हजर ऱ्हायलाच पाहिजे. असं गटाच्या बैठकीला जाऊन तर मला चारजणीत मिसळायची सवय लागली. आधी घराभाइर पडत नव्हते, ती चार-चौघींकडं यायला जायला लागले. त्यानं पण मला चांगलं बोलायला यायला लागलं, बोलायची भीड चेपली. अन् माझी गटांची पुस्तकं पाहून मला वाचाया थोडं थोडं यायला लागलं, लहानपणी तर मी शाळेत २-४ दिवसच गेलेली, पर आता माझ्या पुस्तकात काय लिहिलंय ते मला माझं वाचायला येतं.

"आता गटाचा येवढा इस्वास आलाय, त्याचा अजून चार जणींना बी फायदा व्हावा . म्हणून मी कुंभारवाड्यातल्या बायांशी बोलले. ताईंना सांगितलं का आमच्या लोकांना बी शहाणपण यायला पाहिजे. अन् कुंभारवाड्यातल्या बाया बी गटाच्या बैठकीला चार जणीत यायला लागल्या. त्यातली येक जण तर खाटीक. म्हंजी गटात आल्या म्हणून

त्यांचं सगळ्यांमधी येणं-जाणं सुरू झालं. नायतर त्या बी घरातच अडाणी ऱ्हायल्या असत्या. "

चार वर्षांपूर्वी घराबाहेर न पडणाऱ्या, मान खाली घालून चालणाऱ्या वनशीवबाईंची हिंमत येवढी वाढली की, त्यामुळं केवळ स्वतःपुरता विचार न करता, त्यांच्यासारख्याच चार जणींचा विचार करायला त्या शिकल्या. त्यांना गटातून मिळालेलं बळ त्यांनी अजून दहाजणींपर्यंत पोहचवलं .

## गटातून मिळाली माहितीची ताकद

कातवडी तसं अगदी छोटंसं गाव. बाहेरच्या जगातल्या घडामोडी-बातम्या तिथं कधीतरीच पोचतात. गावात गट सुरू झाले आणि बाहेरच्या जगाची झुळूक कातवडीत यायला लागली. कातवडीतली राधाबाई तर तालुक्याच्या गावी गटांच्या बैठकींना, मेळांव्यांनासुद्‌धा जायला लागली. नवीन ओळखी- पाळखी व्हायला लागल्या. त्यातच राधाबाईला कळलं की जवळच्याच गावातल्या रखमाबाईनं घर बांधायला काढलं. रखमा तिच्यासारखीच गरीब परिस्थितली. घर बांधावं हे तर राधाबाईचं सुद्‌धा कितीक दिवसाचं स्वप्न, पण जमायचं कसं? तिनं रखमाबाईला विचारलं- कसं गं जमवलंस? तिनं सांगितलं की त्यांच्यासारखी परिस्थिती असणाऱ्यांसाठी सरकारची घर बांधणी योजना आहे. त्यातून मिळणाऱ्या मदतीमुळेच रखमानं घर बांधायचं धाडस केलं. रखमाचं ऐकून राधाबाईलाही उभारी आली. तिनंपण त्या योजनेची माहिती करून घेतली, आणि इतके दिवस स्वप्न असलेला विचार प्रत्यक्षात यायची चिन्ह दिसायला लागली!

गटात येण्याआधी राधाबाईला अशी कुठली योजना असते हेच माहीत नव्हतं त्यामुळे मनातली गोष्ट सोडून द्यावी लागत होती. गटानं राधाबाईला सांगावा दिला तो हाच माहितीच्या ताकदीचा! त्यातून जगण्याची उभारी वाढवण्याचा.

***

गटातून बळ मिळवणाऱ्या कितीतरी जणींना, गावोगावी गट पसरावेत अशी ओढ लागली. ती प्रगट झाली अशा गाण्यातून ......

## बचत गट आपण सुरू करू गं

आया बायांना आपण जाऊन सांगू ग ।
बचत गट आपण सुरू करू गं ॥ धृ ॥

आपण साऱ्या मिळून जमू, मिळून सारे नियम करू
असाच व्यवहार कराया आपण शिकू गं ।
बचत गट आपण सुरू करू ग ॥ धृ ॥

एकत्र बसूनी बचत करू, चार चौघींची गरज भागवू ।
हितच बसून आपण हिशोब करू गं ।
बचत गट आपण सुरू करू गं ॥ २ ॥

व्याजाचा दर थोडाच धरू, सावकार मारवाडी माघारी फिरवू ।
हितच आपण वाटप लेखी करू गं ।
बचत गट आपण सुरू करू गं ॥ ३ ॥

हजाराची फेड दोनशेनं करू, पाच महिन्यात पुरी करू ।
उरावरला भार हलका आपण करू गं ।
बचत गट आपण सुरू करू गं ॥ ४ ॥

वीस जणींच्या नावावरी, कर्ज आपण काढूनशानी ।
उद्योगधंदा आपण सुरू करू गं ।
बचत गट आपण सुरू करू गं ॥ ५ ॥

कर्ज आपण वाटून घेऊ, हिशोब त्याचा करुन घेऊ ।
शिल्लक किती राहिली आहे सांगू गं ।
बचत गट आपण सुरू करू गं ॥ ६ ॥

सर शेवटी हिशोब झाला, कागद जमा खर्चाचा झाला ।
कागद काढून निरोप आपण घेऊ गं ।
पुढच्या महिन्याला ११ तारखेला येऊ गं ॥७ ॥

***

## गटाची साथ, उद्योगी हात

### थोड्या पैशाची पण वेळेवर मदत

आंबवणं बाजाराचंच गाव. तिथे दर गुरूवारचा बाजार बसायचा, वीस गावचं माणूस बाजाराला यायचं. गटातली सुशाबाई, जिला वाटलं आपण गटात पैसे उचलावेत आणि करावं काहीतरी! तशी ती धडाडीची. तिनं उचलले हजार रुपये आणि आणले पोतभर कांदे बटाटे ! तागडं लावलं आणि विकायला बसली. एका दिवसात हजाराचे बाराशे झाले. १० दिवस पुरेल इतकी भाजी घरात शिल्लक राहिली. हुरूप वाढला. वेळीच पैसा मिळाला, तर पैशानं पैसा वाढतो हे ऐकलेलं, तिला पण पटायला लागलं!

### डोक्यावरलं दुकान

वेल्ह्याची चव्हाणबाई, कष्टाला कमी नाही. पण कायम नशीबाला बोल लावायची. त्यात चार वर्षापूर्वी सारी वेल्ह्याची पेठ अपघातानं जळून गेली. तिचं पण नुकसान झालं, पण तिनं पुन्हा उभारी धरली. गाव बाजाराचं तिथं भाजीचं दुकान टाकलं. पण बाजार आठवड्यातला एकच वार. तेवढं तिला पुरेना. मग गटातनं पैसे काढले आणि पुण्याच्या बाजारातून पाटीभर वस्तू घेऊन आली. खेळणी, गाळणी, चमचे, डब्या, टोपल्या सारं प्लॅस्टिकचं रंगीत रंगीत. वेल्ह्यातल्या बाजाराला ज्या गवांमधून लोकं येतात त्या गावी गेली आणि हळी देऊन सामान विकू लागली. एक बाजाराचा दिवस माणसं तिच्याकडं यायची आणि बाकी दिवस ती माणसांकडे जायची. डोक्यावर टोपलीत मावेल तेवढं तिचं

दुकान, भांडवल किती म्हणाल तर ५०० रुपये फक्त पण धडपड किती म्हणाल तर आभाळभर- म्हणून सुचतं काय करावं ते!

## सोताच्या हिंमतीवर .....

स्वत:च्या हिंमतीवर मोठ्या केलेल्या उद्योगाची सुरूवात बचत गटाच्या उलाढालीच्या हिंमतीतून झाली असं वेल्ह्याची द्वारकाताई सांगत होती. तिचे अनुभव ऐकायला अशाच साऱ्या जमल्या होत्या. द्वारकाताई सांगत होती.

'दाराला टांगलेली किटली वाऱ्याबरोबर झोका खात हुती. अन् प्रत्येक झोक्याबरोबर मला सांगत हुती 'मला वापर ! मला वापर !' 'ऐकलं. ऐकलं.'द्वारकाताई म्हणाली किटली उचलली. चहा, साखर, पेले खरेदी केले. ५० रुपये खरचले. अन् आमच्या गावातच रस्त्यावर चहाची टपरी सुरू केली. अवं हिंमत बांधल्याबिगर काय तरी हुईल का ? तशीच म्या हिंमत बांधली. अन् वाढवत-वाढवत सोताचं हाटेल बी टाकलंय . आमच्या गावात धरण बांदत्यात. त्याचं लई गिऱ्हाईक सकाळ -दुपार -संध्याकाळ माझ्या हाटेलात येतंय .सोताच्या हिंमतीवर, सोताच्या हक्काची कमाई खायला गावतीय."

"गटात यायला लागल्यापासूनच यवढी सुधारली द्वारकी. आधी कुठं येणं नाय, जाणं नाय, घरचं कुणी बी इचारत न्हवतं. आन् आतापार बी. डी. ओ. पातुर नाव पोचलय. मागच्या खेपेला आपल्या गावात शिक्षकांचं शिबिर हुतं. तर द्वारकी काम पायजे म्हणून पार बी. डी. ओ. कडं गेली. त्यांना आपल्या गटाची समदी म्हाइती सांगितली अन् सर्व्या शिक्षकांसाठी डबं करायचं ठरवलं . आन् गटाच्या मदतीनं पार बी पाडलं. तशी अडाणीच ! शिक्षण नाय, त्याच्यामुळं हातावरचं पोट. पण आपल्याला फायदा पायजे , तर आपुनंच हात-पाय हालवायला हवं." संजाबाई म्हणाली.

"धंदा चालवनं , सगळ्यांचं काम नाय. आपल्याला तर नाय जमायचं त्ये." मंजुळा बोलली.

"तुझीतरी कमालच . आता या द्वारकीपाशी काय डबोलं हुतं का काय धंदा सुरू करायला? फकस्त ५०रुपये घरबसल्या धंदा सुरू केला तिनं! धंदा कशाचा करायचा ह्ये तिनं बराबर वळखलं , अन् त्येवढी जोखीम पत्करली. लक्ष्मी कधी उगाच येत नसती, आपण तिला आणाया लागतं."

द्वारकाताई म्हणाली, "गटातल्या इतर बायांच्या आणि ताईंच्या बोलण्यानं गटाचा हिशेब कळायला लागला. त्यानं मी किती सुधरली हाय त्ये तुमी बघताच की."

"मी काय म्हनते, हिंमत आन् चिकाटी असली म्हंजी सगळंच हुतंय असं नाय. गडीमान्सांची अडवणूक किती असती बायांना." मंजुळा पुन्हा म्हणाली.

"अगं सांते , बाई मानूस पुढं गेलं की पुरुषाला स्वतःचा अपमान झाल्यागत वाटतयं, ह्ये तर माझ्याबी वाट्याला आलंय . पर त्यातून बी आपुन हिंमत धरली तर काम हुतंय, आन् आपण कमाई केली की त्येवढा बोलायचा हक्क बी मिळतोय आपल्याला. आता माझ्या हाटेलाचंच बग , मालक माझ्या जोडीनं राबतायत."

"द्वारकाबायने खत इकायचा धंदा बी केला, त्यासाठी ही द्वारकी सोताच्या जिवावर कंत्राटदाराशी बोलून खताच्या गोणींची गाडी घेऊन तिच्या गावाला आली, आन् नवऱ्याला सांगितलं, की पोती उतरून घे. गावातल्या इतर बायांनी ऐकलं, की बाईमाणूस, स्वतःच्या मालकाला असं सांगतीय . त्यांना दिसलं, की गटात आल्यामुळं त्यांच्याच सारख्या बाईला केवढी हिंमत आली, घरच्यांची तिच्याकडं बघण्याची नजरच बदलली आहे. तवा त्यांनी मनानंच गट सुरू केला . ही द्वारकीच त्यांना गटाचं काम समजून देती. तिला स्वत:ला नाही येत लिहा वाचाया तरी

व्यवहार कसा करायचा ते चोख सांगते.'' संजाबाई पुन्हा बोलली. तिला द्वारकीच भारी कौतुक.

"आपल्यासारख्या बायांना हक्काचा आधार होतो गटामुळं! दारूड्या नवऱ्यांच्या बायकांना चोरून पैशे साठवायची सोय होती . मला जसा गटाचा आधार झाला तसा समद्यांनाच व्हायला पायजे, म्हणून मी गट सुरू करायला येळ काढला."

"आक्का तुमी बोलता तसं दिव्यानं दिवा पेटवावा , तशा आपण बी द्वारकाबायच्या संगतीन शाण्या होऊ." संजाबाई म्हणाली.

## उद्योगाचे घरी लक्ष्मी वास करी

उषा आणि पद्मा गायकवाड यांची धडाडी वेगळीच. तोरणा किल्ल्याच्या पायथ्याशी बसलेल्या वेल्हे गावात, माळावरच्या वस्तीवर रहाणाऱ्या दोघी. परिस्थिती गावकुसाबाहेरच्या सगळ्याच वस्तीची असते तशी.

नवीन काही शिकायला मिळावं म्हणून दोघीजणी गटात यायला लागल्या. पण निव्वळ पैसे बाजूला टाकायचे, याहीपेक्षा काही ना काही वेगळा उद्योग केला पाहिजे हे दोघींच्याही डोक्यात पक्क होतं. त्यांचा उत्साह बघून ताईंनी त्यांना उद्योगासाठी गट करायला सुचवलं. माळावरच्या दारिद्र्यरेषेखालच्या महिलांनी गट केला तर त्यांना उद्योगासाठी आर्थिक मदत देण्याची सरकारी योजनाही सांगितली. पुढाकार घेऊन दोघींनी गट सुरू केला. त्यांनी खडू तयार करण्याचा उद्योग करायचं ठरवलं. मन घट्ट करून सरकारी कचेऱ्यांमध्ये जाऊन, सगळी माहिती करून घेतली. खडू तयार करायला शिकणं आणि तेवढी रक्कम हाताळायला शिकणं सगळंच नवीन होतं. तेही त्यांनी केलं. पुण्याहून उद्योगासाठी नेमक्या अंदाजाप्रमाणे सामान खरेदी करणं, गटाबरोबर खडू तयार करणं, तयार मालासाठी बाजारपेठ शोधणं, प्रत्येकच काम

शिकण्याची नवीन पायरी होती. संस्थेच्या ताईंची, संस्थेची मदत होती, पण पुढाकार आणि धडपड मात्र या दोघींची. यातून चुकत आणि त्यातून शिकत-शिकत, खडू उद्योगाचा जम बसला. आता तालुक्याच्या गट विकास अधिकाऱ्यांच्या मदतीने वेल्हे तालुक्यातील सर्व शाळा त्यांच्या मेंगाई बचत गटाचे खडू वापरायला लागल्या आहेत. दिलेल्या मालाची वसुली कशी करायची असंही त्यांचं शिक्षण सुरू झालं आहे.

या उद्योगाच्या अनुभवातून दोघीही कितीतरी गोष्टी शिकल्या, माणसांच्या आणि पैशाच्या व्यवहाराच्या. उषाताई आणि पद्माताई एकदा पुण्यात गेल्या. संस्थेत त्यांना दिसलं की देवपूजेचं सामान म्हणून निरनिराळ्या प्रकारच्या गवताच्या काड्या, काही झाडांच्या काटक्या अगदी लहान बोटाएवढ्या त्यांच्या जुड्या करून विकायला ठेवल्या होत्या. त्या ठराविक गवताच्या काड्यांना म्हणायचं दर्भ आणि ठराविक झाडांच्या काटक्यांना म्हणायचं समिधा. या शहरात कुठून मिळणार? तेव्हा या अशा रानातून आणून विकायला ठेवतात, आणि लोकं रुपयाला एक अशा भावानं ही एक बारकी जुडी विकत घेतात.

दोघींनी त्या दर्भ, समिधांच्या झाडांची नावं विचारून घेतली. नंतर असं सामान मिळणाऱ्या बाजारचा फेरफटका करताना दोघींनीही मुद्दाम ठिकठिकाणच्या समिधा-दर्भ बघितले. आणि त्यांच्या लक्षात आलं, की भलत्याच नावाखाली भलत्याच काटक्या आणि गवताच्या काड्या विकल्या जात होत्या!

परत जाताना दोघींच्याही डोक्यात चक्र सुरू होतं. आपल्याला रान इतकं चांगलं ओळखीचं, तर आपणच का नाही सगळं गोळा करून विकायला सुरुवात करायची? आणि झालं सुरू !

कोणतं गवत, कोणती झाडं, एका जुडीत किती मापाचे तुकडे, सगळं नीट समजावून घेतलं. फावल्या वेळात रानात, ओढ्याकाठी

जाऊन सगळं गोळा करायचं,आणि घरचं उरकलं की, गवत काड्या वेगवेगळी करणं, नेमक्या मापात कापणं, जुड्या बांधणं असा घरच्या घरी उद्योग सुरू झाला. संस्थेनं यांच्या पहिल्या मालाला बाजार मिळवून दिला. वस्तीवरच्याच दोघींना हाताशी धरून पहिली ऑर्डर पोचती केली ती ५०० जुड्यांची! त्यातून शिकल्या आणि नेमानं दुकानाला पुरवू लागल्या. ''डोईजड होणाऱ्या मोळीपेक्षा हे बरं, यात झाड पण वाचतं.'' असं सांगून चार जणींची पोटापाण्याची सोय त्यांनी केली.

गटामुळे बाहेर फिरणं होतं, नवं काही बघणं होतं, नवीन सुचतं, नवी दिशा मिळते याचंच हे चांगलं उदाहरण नाही का? जिथे बारमाही रोजगार कधीच मिळत नाही तिथे असा रोजगार निर्माण करणं, ही लाख मोलाचीच गोष्ट म्हणायला पाहिजे नाही का? हिंमत केली की - गटाच्या साथीनं लक्ष्मी आपल्या घरी चालत येते.

## बाई मी उद्योग करते

जातिवंत उद्योजिका कशी असावी ते शिकावं भारतीताईंकडून!

गटानं भारतीताईंच्या गुणांना खतपाणी घातलं. त्यामुळे तर - उत्साहानं आणि विश्वासानं नवनव्या जबाबदाऱ्या पेलणाऱ्या भारतीताई सुवासिनी बचत गट कारभाराचा आधार बनल्या आहेत.''

अमरावतीची भारती, लग्नानंतर शिवापुरात खासबागे होऊन आली. एम्. ए. पर्यंत शिक्षण झालेलं. नवीन गावात फारशा ओळखी नाहीत. प्रश्न पडायचा, 'करायचं तरी काय?' मग तिला कळली गटाची माहिती. चारचौघीत येणं-जाणं होईल. म्हणून गटात यायला तिने सुरूवात केली. दोन वर्षं भारती नियमितपणे गटात येत गेली. पण हळूहळू भारतीला दिसलं,की आपल्यापेक्षा कमी शिकलेल्या, अगदी निरक्षर बायकासुद्धा घराबाहेर पडतात, स्वतःच्या हिंमतीवर उद्योग करून, संसाराला हातभार

लावतात , मग आपण का नाही प्रयत्न करायचा ?

माहेरी असताना भारती थोडं शिवण शिकली होती. त्याचा उपयोग करून गावातल्या महिलांसाठी साड्यांना फॉल- पिको लावायचा उद्योग सुरू करावा असं भारतीनं ठरवलं. धीर करून बोलणं केलं, आणि गटातून पहिली उचल रुपये ५०००/- घेतली. पुण्यातून फॉल-पिकोचं मशिन आणलं आणि स्वतःचा उद्योग सुरू केला. धंद्यात जम बसला. महिन्याला ५० साड्यांना फॉल -पिको लावून त्याच मिळकतीतून आणि यजमानांकडून अशी हप्त्या-हप्त्याने उचल फेडून झाली. उद्योग कशाचा करायचा हे भारतीनं नेमकं ओळखल्यामुळे हे घडलं.

भारतीचा कामातला व्यवस्थितपणा, उत्साह बघून ताईंनी एक वेगळाच उद्योग तिला सुचवला. 'फोटो काढण्याचा ' गावामध्ये फोटो काढायला रोज-रोज येणार कोण? तर आपल्या गटातल्या बायकाचे, गटातल्या तीन प्रमुखांचे बँकेत खाते उघडण्यासाठी फोटो द्यावेलागतात आणि शिवापूरच्या आसपास गट इतक्या वेगाने वाढतायत, की दर ८-१५ दिवसांनी कुठे -ना कुठे फोटो काढायला लागतातच. ताईंनी कॅमेरा भारतीला भाड्याने वापरायला दिला. मनातून भारतीला जरा धाकधूकच, फोटो काढताना कुणी बघितलं तर ? पण कॅमेरा जरा हाताळल्यावर विश्वास आला आणि भारती रुबाबात फोटो काढायला लागली. गटातल्या महिलांचं काम गटातल्या महिलेनंच करायला सुरूवात केली आणि गटातला पैसा गटामध्येच खेळता राहिला. शिवाय दहा ठिकाणी ओळखी झाल्या हा फायदा वेगळाच.

गटाच्या निमित्तानं भारतीताईंच्या अंगच्या उद्योगाच्या गुणांना संधी मिळाली. एकदा संधी मिळाल्यावर त्यांनी ती पुरेपूर वापरली अणि मग अजून जबाबदारीचं काम घ्यायची हिंमतही आली. त्यानंतर ७ जणींचा शिवाई गट करुन, शिवाई नावाने गटानं उद्योग करायचा ठरवला. खांद्यावर

मस्तपैकी अडकावायच्या-रेक्झीनच्या पिशव्या-तयार करायच्या. सगळी जबाबदारी गटाची -खरेदी- ऑर्डर नुसार संस्थेत माल पोचता करणं, हिशोब करणं, सगळंच! भारतीताईंकडे खातं आलं हिशोबाचं आणि खरेदीचं. दर वेळी गटातली एक जण भारतीताई बरोबर खरेदीला येते. दोन -अडीच तासात एक बॅग शिवायची. एका बॅगला २५ रुपये करणावळ. सातही जणींनी २०० रुपये या उद्योगासाठी गुंतवले आणि स्वतःच्या पैशातून उद्योग सुरू केला. आता सर्व गटांना लागणाऱ्या पिशव्या भारतीच बनवते.

गटात आल्यामुळे भारतीताईंच्या अंगच्या उद्योगाच्या गुणांना फुलायला, वाढायला संधी मिळाली ही खूपच महत्त्वाची गोष्ट. पण त्याही पेक्षा अधिक काहीतरी भारतीताईंना गटातून मिळालं. सुरूवातीला कोणत्याही मोठ्या लोकांशी, अगदी संस्थेच्या ताईंशीसुद्धा एकटीनं बोलायला दडपण येणाऱ्या, कुणाची तरी सोबत लागणाऱ्या भरतीताई "बचत गटाचं प्रशिक्षण द्यायला किती मजा येते," असं म्हणतात आणि सर्वांच्या लक्षात रहातात ! संघटिकांच्या जोडीनं बचत गटाचा कारभार साभाळतात. शिवापूरच्या बचत गट ऑफिसात पूर्वी कधीतरी जाणाऱ्या भारतीताई आज तिथली जबाबदारी नियमितपणे सांभाळतात. गटामुळे भारतीताईंना स्वतःच्या वाढण्याची दिशा गवसली ही खरी मोलाची गोष्ट!

***

## आम्ही गटाला वाढवलं,

## गटानं आम्हाला वाढवलं,

दुष्काळामुळे शेतीवाडी परवडेनाशी झाली म्हणून बीडमधून थोरात कुटुंब शिवापूरमध्ये आले. शिवापूर गावात कारखाने, उद्योग खूप गावात बिगारीची कामंही निघतच असतात, त्यामुळेच हातावरचंच पोट असणाऱ्यां सगळ्यांनाच शिवापूरात आसरा मिळत असतो- तसा तो थोरात कुटुंबीयांनाही मिळाला.

घराताला पुरूष कर्ता कमविता असला तरी घरातल्याच बाईलाच घरची लक्ष्मी का म्हणतात, हे थोरातांच्या उदाहरणावरून सहज समजावं.

कितीवेळा तरी घरी आलेल्या अडचणींमुळे घरातली सून पांढऱ्या पायाची ठरते. मोहोरताई थोराताचंही तसंच झालेलं होतं. घरची परिस्थिती खालावली ती हिच्याच पायगुणानं असं घरचे म्हणायचे. माझा दोष नसताना मला बोल लागायचे म्हणून मोहोराताई कष्टी व्हायच्या. आधीच सासूरवाशीण. त्यात अवगुणी म्हटल्यावर मोहोरताईंच्या कुठल्याही शब्दाला काडीइतकी किंमत नव्हती.

ताई शिवापुरात आल्या ते मरगळल्या मनानं. घरातली परिस्थिती अशी! त्यामुळे स्वत:बद्दल विश्वास तरी कसा वाटावा? मोहोरताईंना लाख वाटायचं, आपण गावी काहीतरी हातभार लागावा, जरा तरी आपल्याला सासरच्यांनी भलं म्हणावं. पण परक्या गावात राहून पोट भरायचं म्हणजेच तारेवरची कसरत! मदत होणार तरी कुठून?

तरी मोहोरताईंनी हिंमत सोडली नव्हती. स्वत: दहावीपर्यंत शिकलेल्या होत्या. एकं दिवस त्यांच्याबरोबर मजुरी करायला येणाऱ्या

जाऊबाईंनी त्यांच्या बचतगटाची माहिती सांगितली. अडी-अडचणीला आधार होईल म्हणून मोहोरताईंना मोठा हुरूप वाटला, आणि त्या नियमित गटात यायला लागल्या. गटाबद्दल विश्वास आला, तसं गटातल्या बाकीच्या मैत्रिणीचं बघून, त्यांनीही अर्थसाहाय्य घ्यायचं धाडस केलं. परक्या गावात राहून पैशाची उचल घ्यायची तयारी दाखवायची म्हणजे हिमतीचंच नाही का?

पहिलीच उचल रुपये ५००० ची घेतली गावाकडच्या शेतीसाठी आणि या उचलीनं केवळ शिवापुरातल्या मोहोराताईंच्या घरातच नाही, तर बीडमधल्या घरामध्ये सुद्धा लक्ष्मी आली.

गटातून घेतलेल्या उचलीच्या आधारावर मोहोराताईंनी कांद्याची लागवड केली. वेळेवर पैशाची मदत झाल्यानं लहानशाच जमिनीच्या तुकड्यावर भरघोस पीक आलं. चांगला भाव मिळाला आणि ५००० च्या उचलीवर मोहोरताईंनी ९००० रुपये मिळवले. अर्थसाहाय्य तर फेडलेच शिवाय खर्च वजा जाऊनही वर मिळकत झाली.

स्वत:ला सापडलेलं सुख -समाधान मोहोराताईंनी स्वत:पाशीच मात्र नाही ठेवलं. त्यांच्यासारख्याच उपऱ्या कुटुंबाची नड त्या विसरल्या नाहीत. स्वत:च्या अनुभवामुळं, परक्या गावात गटाचा आधार मिळणं म्हणजे काय हे त्यांना चांगलंच ठाऊक झालेलं होतं. म्हणूनच त्यांनी अशा महिलांचा गट सुरू केला.

अशीच कथा त्यांच्या जाऊबाईंची - कान्होपात्रा थोरातांची. त्याही अशीच हिंमत करून गटात आल्या आणि शेतीसाठी अर्थसाहाय्य घेतले आणि त्यांनाही शेती परवडायला लागली. त्यांनी ठरवलं, स्वत:ला जे कळलं ते ज्यांना गरज आहे त्यांच्यापर्यंत पोचवायचं. हेच कान्होपात्राबाईंचं वेगळेपण, त्या म्हणतात 'दुसऱ्यांचं भलं करायचं ठरवलं, तर कमी शिक्षण आड येत नाही, की घरची गरिबी आड येत नाही.'

'मी शिकल्याली नसली म्हणून काय झालं? लेकीला ब्येस शिकवतीया. पोरगी कालिजात जाती. त्यातूनबी येळ काढून संस्थेच्या ताईंबरोबर, गावातल्या शाळकरी पोरींना काय-काय शिकवती. मी तर तिला भूकंपातल्या लोकांना मदत करायला बिहारला पाठवलं होत. आन् अजून लई शिकायचंय तिला, मोठं व्हायचं म्हनती.'

आई लेकीला घडवू शकते ती अशी! गटातून पैसे काढून त्यांनी मोठं घर बांधलंय, परक्या गावात स्वतःच्या हिंमतीवर घर बांधणं सोपं नाही! तेही त्यांनी केलं.

बचत गटाला भांडवल गटाची कल्पना दिली ती कान्होपात्रा थोरातांनी. अशी नवीन कल्पना सुचायला शिक्षण लागत नाही, की पैशाचं पाठबळ लागत नाही. त्यासाठी त्यामध्ये मन गुंतायला लागतं आणि गरज भागवण्याची धडपड असावी लागते. असं असलं की सगळं सोपं होऊन समजायला लागतं.

## इथे गट जमतात

महिला म्हणून आपण कुठेही राहात असलो, कितीही कमी जास्त शिकलेल्या असलो, तरी एक गोष्ट आपल्याला सर्वांनाच सारखी आहे - ती म्हणंजे बंधन! दबाव ! कसं वागायचं? कसं बोलायचं? कुणाशी बोलायचं? अगदी उठायचं कुठे? बसायचं कुठे याची सुद्धा बंधनं असतात. वर्षानुवर्ष याआधी जे कुणी केलं नाही ते मीही करायचं नाही, असा संस्कार मनावर असतो.

शिवप्रदेशातल्या महिला गटात यायला लागल्या आणि याच्यात थोडे थोडे बदल व्हायला लागले. महिलांनी अमुकच ठिकाणी बसायचं, किंवा बसायचं नाही, अशी बंधने दूर सारायची हिंमत हळूहळू महिलांना यायला लागली.

## गट भरतो चावडीवर

गावाची चावडी म्हणजे सगळ्या बाप्यामंडळींचं एकत्र जमण्याचं ठिकाण. गावातल्या ठिकठिकाणच्या बातम्या, घडामोडी या चावडीवरून गावात पसरत असतात.असं हे खास गावाच्या हक्काचं ठिकाण. वेल्हे हे तालुक्याचं गाव. तिथं गट सुरू झाले. गटाची बैठक घ्यायची कुठे? चर्चा सुरू झाली. पुरेशी जागा असलेलं, सगळ्यांच्या सोयीचं ठिकाण म्हणजे चावडी. ताईंनी सुचवलं 'चावडीवर जमूया. 'बया असं कुठं झालंया? बाया मान्सं अन् चावडीवर? आजवर कधी कुनी असं केलंया?' असे उद्गार महिलांकडून निघाले. ''पण सगळ्याजणींनी मिळून, सोय म्हणून बसायला काय हरकत आहे?'' ताईंनी विचारलं बऱ्याच वेळानं काही जणींची हिंमत झाली. "चावडी काय कुनाच्या मालकीची नाय. आन् आपून चांगल्या कामासाठीच जमनार !" असं म्हणत काही जणी ताईंबरोबर निघाल्या. त्यांचं पाहून बाकीच्यांनाही धीर आला. आणि दुसरी सोयीची जागा मिळेपर्यंत म्हणजे जवळजवळ वर्षभर महिला गटासाठी चावडीवर जमत राहिल्या. चावडी सगळ्या गावाची म्हणजे महिलांचीसुद्धा. हे समजायला उमजायला लागलं गटातूनच.

## मंदिर सगळ्यांना खुलं

एका गावात मंदिरासमोरून महिलांनी चपला घालून जायचं नाही असा नियम होता. मात्र हा नियम गावातल्या पुरूषांना लागू नव्हता. त्यामुळे महिलांची वर्दळ मंदिरापाशी कमीच. गटाची बैठक देवळात व्हायला लागली आणि महिला नियमितपणे देवळात जायला लागल्या. फक्त महिलांनीच चप्पल न घालण्याची पद्धत सोडून देण्याची हिंमत या बैठकांतून महिलांमध्ये हळूहळू आली, आणि आता गावकरीही त्याला सरावले.

कुसगावचं देऊळ विठोबा-रखुमाईचं. 'बाजूला बसायचं' असल्यानं काहीजणी महिन्याच्या बैठकीला नियमितपणे गैरहजर रहायच्या. गटातल्याच सुमनबाईंनी यावर तोडगा काढला. ती म्हणाली 'विठ्ठलाशेजारी उभी हाय ती रखुमाईच न्हवं? मंदिरात तिला समजतं सगळं" आणि त्यानंतर गटाच्या बैठकीला सगळ्याजणी मोकळेपणानी यायला लागल्या.

**बैठकी बसल्या आणखी कुठे कुठे**

शिवापूरच्या अनेकजणी बैठकीच्या निमित्ताने दर महिन्याला **संस्थेत** येऊ लागल्या. शिवरे वस्तीवरचे गट **समाज मंदिरात** बसू लागले.

'कुणाच्या घरी बसून मिंधं कशाला व्हा?' असं म्हणत ससेवाडीचे गट **ग्रामपंचायत कार्यालयात** बसायला लागले.

कांजळ्याचे गट 'गावकीची शाळा म्हणजे आपलीच' असे म्हणून रात्रीचे **प्राथमिक शाळेत बसायला** लागले.

सणसवाडीचे गट **बालवाडीत** बसायला लागले.

ह्या सगळ्या सार्वजनिक जागा आता महिलांनाही हक्काच्या वाटू लागल्या आहेत. प्रबोधिनीच्यावतीने काढलेल्या दिल्ली सहलीत भाग घेणाऱ्या काही प्रमुखांनी महिलांच्यासाठी गावात स्वतंत्र खोली बांधावी असा आग्रह नेत्यांकडे धरला आहे. बचत गटाच्या बैठकीच्या निमित्तानं घराचा उंबरा ओलांडणाऱ्या या महिलांना आता सर्व ठिकाणी वावरण्याची धिटाई आली आहे.

***



## पैसे असे खेळतात.....

सखुबाईकडं एक **१० रुपयाची १ नोट** होती.

तिच्या घरी पाहुणे आले म्हणून तिला सरबत करायंच होतं. ती गेली पारुकडे तिच्याकडनं तिनं १० रुपयाची **नोट देऊन ४ लिबं खरेदी** केली.

पारुचं दळण भिमाच्या गिरणीत दळायला दिलं होतं. पारुनं सखुनी दिलेली १० रुपयाची **नोट भिमाला दिली आणि दळण घेऊन** आली.

भिमाचं झंपर राधाकडं शिवायला दिलं होतं. दळणाचे पारुनं दिलेले १० रुपये **तिनं राधाला दिले आणि झंपर घेतलं**

राधाने ते **१० रुपये चहासाठी साखर आणायला वापरले** तेव्हा ते सुजाताकडे गेले.

म्हणजे बघा, **१० रुपयाची एकच नोट होती.** पण त्यातनं सखु-लिंब, पारु-दळण, भिमा-झंपर, राधा-साखर अशा ४ जणींची खरेदी झाली. आणि पुन्हा सुजाताकडं १० रुपये जमा झाले. म्हणजे **१० रुपयाच्या नोटेतून फिरत राहील्या मुळे ४ जणींची मिळून रुपये ४० ची गरज भागली. याला म्हणायचे पैसे खेळण.** आपापसात व्यवहार करण्याचा हाच फायदा. बचत गटाच्या व्यहारामुळंही असंच होतं !

अधिक तपशील – परिशिष्ट १, पान ७२

## केल्यामुळे... विश्वास वाढला

''शिवापुरातला पहिल्या नंबरचा गट म्हणजे आमचा गट. आता त्याला ५ वर्षं पूर्ण होतील. ठरल्याप्रमाणे आमचा गट ५ वर्षं चाललाय.'' शिवापूरच्या कांचनताई पुरंदरे गटाबद्दल फार अभिमानाने सांगत होत्या.

पाच वर्षांनंतर गटाचा हिशोब करून पैशाचे चोख वाटप केले. इतरांची मदत घेऊन नीट उरकलं. साऱ्यांना समाधान वाटलं आणि पुन्हा त्यांनी नव्या विश्वासानं गट सुरू केला.

"शाळा सोडून किती वर्षं झाली. गटामुळे पुन्हा शिक्षण सुरू झालं. घरचं संभाळून पुन्हा गटाचं करायचं, म्हणजे बरीच धावपळ व्हायची, पण गटाची साथ आहे म्हणून उत्साह वाटतो. इच्छा असली आणि शिकायची तयारी असली म्हणजे एकाच वेळी अनेक गोष्टी करता येतात."

'' गटामुळं चांगलं काहीतरी करण्याचं समाधान मिळतं ! चार गरजू महिलांनाही मदत करता येते. आमच्या गावाजवळच्या वस्तीमध्ये मी शेतमजूर महिलांचा गट केला. वाल काढायला, टोमॅटो खुडायला आमच्या शेतावर मजुरीनं महिला येतात, तेव्हाच त्यांना मी गटाबद्दल सांगितलं. आणि त्यांचा गट सुरू झाला. मला जे येते, ते इतर महिलांना शिकवायची त्या निमित्ताने संधी मिळते.''

कांचनताईंचं तर स्वत:चं सगळं चांगलं चाललं होतं, मग त्यांना दुसऱ्या कुणाचा विचार करण्याची काय गरज होती? कुणासाठी तरी का करावंसं वाटलं? तर दुसऱ्या कुणाचं तरी भलं व्हावं यासाठी करावसं वाटलं. त्यांचं एकत्र कुटुंब ! त्यामुळं पहिल्यापासून जबाबदारीनं खूप काम करण्याची त्यांना सवयच होती, तरीसुद्धा गटात आल्यामुळं विश्वास

वाढला. आता त्या या सगळ्याबरोबरच छोटे छोटे उद्योग करू लागल्या आहेत. त्या भाजणी बनवून विकतात, लिक्विड सोप, लेदर बॅगही विकतात. स्वतः मधला विश्वास वाढला की जमतं सारं.

## मलाच माझी ओळख पटली

ब्राह्मणाच्या सुनेनं धनगरवाड्यावर जायचं? आजवर न ऐकलेली, घडलेली गोष्ट. सुखदाताईंनी ही चाकोरी ओलांडली आणि ती ओलांडतानाच त्यांना स्वतःची ओळखही पटत गेली.

''मला कधी वाटलंच नव्हतं बघा, की घराबाहेरच्या जबाबदाऱ्या मला कधी घेता येतील म्हणून. मला कुणी सांगितलं असतं, की तू बँकेचे व्यवहारसुद्धा बघशील तर माझा विश्वासच बसला नसता. कधी घराबाहेर पडायची वेळच आली नव्हती. गावाबाहेरच्या धनगरवाड्यात तर मी पाऊल ठेवीन असं स्वप्नातसुद्धा वाटलं नव्हतं.''

आंबवणे गावात गट सुरू झाले तेव्हापासून गटाबरोबर असणाऱ्या सुखदाताई देशपांडे सांगत होत्या. गावातल्या ब्राह्मणाची सून गावाला माहिती असणार ती ब्राह्मणाच्या घरातली सून नाहीतर अमक्याची बायको म्हणूनच. याच्यापलिकडे महिलेची काही वेगळी ओळख असल्याचं आपण काही पहात नाही. पण सुखदाताईंची अशी वेगळी ओळख त्यांनी निर्माण केली. गावात आता केवळ त्या संजूकाकांची बायको म्हणूनच नाही तर देशपांडेवहिनींची सून म्हणूनच नाही तर बचत गटाच्या सुखदाताई, बँकेच्या योजनेत असणाऱ्या सुखदाताई, उद्योग करणाऱ्या सुखदाताई, म्हणून जास्त ओळखल्या जातात.

सुखदाताई सांगतात ''आमचा वैभवलक्ष्मी गट सुरू झाला तेव्हाची गोष्ट. ताई गावात घरोघरी फिरून गटाची माहिती सांगत होत्या. पण दर महिन्याला २०रुपये भरायची जोखीम कोण घेणार? त्यामुळं कोणीच महिला गटात येईनात. गटाची माहिती ऐकल्यावर मला वाटलं की यात

फायदा आहे. करून बघितल्या शिवाय फायदा होतो का तोटा ते कसं कळणार? माझ्यासारखंच आमच्या बालवाडीच्या सुनिताबाईंना पण वाटायला लागलं. तेंव्हा आम्ही दोघी-तिघींनी ठरवलं, 'तोटा झाला तरी चालेल,पण एवढी जोखीम उचलायचीच,' असं म्हणून बाकीच्यांना पण तयार केलं आणि एकदाचा आमचा गट सुरू झाला.

सुरूवातीला आमच्या गटाला अजिबात वळण नव्हतं. सारखी भांडणं, वादावादी व्हायची. पण हळूहळू सवय लागली. गटाचं हिशोब कसे करायचे, बायकांची पुस्तकं कशी भरायची, उचल घ्यायची रक्कम समजूतीनं कशी वाटायची हे कळायला लागलं. त्यामुळं स्वत:बद्दलचा विश्वास पण वाढला. इतका की गटाच्या साथीनं छोटे- छोटे उद्योग सुरू करण्याची हिंमत आली.

सुखदाताई कधी बटाट्याचे पापड करून ते विकायला पाठवतात, कधी शेतावरच्या मजूर बायकांनी रानातून गोळा केलेला मध विकायला ठेवतात, परड्यात शतावरी लावून त्याच्या मुळ्या विकतात. असे घरबसल्या करता येतील असे उद्योग त्यांनी सुरू केले.

महिलांना घर संभाळून कितीतरी गोष्टी करायला येतात, त्यातून आपल्या हातात पैसा कसा खेळेल याचा विचार सुखदाताईंनी केला. बरोबर उद्योग करण्याची किल्ली तर हीच आहे, पण एवढ्यावरच सुखदाताई थांबल्या नाहीत. त्यांच्यापर्यंत पोचलेला गट त्यांनी अजून दूरवर पोचवला. त्यांचं काम बघून आता आंबवणं गाव ग्रामीण शासनाच्या पतपुरवठा कार्यक्रम योजनेत (एम्. आर. सी. पी.) त्यांना घेतलं गेलंय. त्यांनी गावातल्या काम करणाऱ्यांची मोट बांधली आणि गावाचा विकास करायचं साऱ्यांनी मिळत ठरवलंय.

''एरवी धनगर महिला आमच्या देशपांड्यांच्या घरात यायच्या त्या कामासाठी, शेतमजुरीसाठीच. जसा मला गटाचा फायदा व्हायला

लागला, तसं वाटलं, यांच्यापर्यंत गट कधी पोचायचा? यांना तर गटाची गरज माझ्यापेक्षा जास्त आहे. या महिलांना जर त्यांची समज नसेल तर मला ते सांगितलं पाहिजे. म्हणून संस्थेच्या ताईंच्या साथीनं धनगरवाड्यावर गेले. इतके दिवस गावात राहूनपण धनगरवाड्याची वस्ती कुठं ते मला माहितच नव्हतं. बामणीण आपल्या घरात गटाबद्दल सांगायला येतीय म्हटल्यावर धनगर महिलांनी विश्वासानं आणि उत्साहानं गट सुरू केला. धनगर महिलांना शिक्षण कुठून असणार? मग माझ्या शिक्षणाचा उपयोग त्यांच्या हिशोबासाठी पण करायला लागले."

स्वत:ला काही गरज नसताना स्वत:च्या घरापलीकडे पहायचं, जे पूर्वी कुणी केलं नव्हतं, असं काम करणं, म्हणजे मोठीच मोलाची, तेवढीच हिमतीची गोष्ट! स्वतःमधली हिंमत सुखदाताईंना यातूनच कळली. गटातून स्वतःची ओळख पटत गेली ती अशी. आपली ओळख पटवून घेताना सुखदाताईंची कहाणी आपल्याला नक्कीच सोबत करेल.

## गटानं दिली 'एक' व्हायला संधी

गट चालू झाले तशा महिला एकमेकींत जात-पात, गरीब श्रीमंत असा फरक न करता मिसळायला शिकल्या. चुकीच्या पद्धती सोडण्याची हिंमत एकदम येत नाही, ती हळूहळूच येते.

### जातपात विसरूया एकोप्यानं राहू या

''एरवी रामाच्या मंदिरातसुद्धा मांडीला मांडी लावून बसतो, रामसुद्धा कोणाला काही म्हणत नाही, अन् घरी आले तर तुमच्या जावेनं पाणीसुद्धा विचारलं नाही? खालच्या जातीचे असलो म्हणून काय झालं ? ''

शिवापूरच्या सखुबाई दुखावून सविताताईंना सांगत होत्या. सविताताई त्यांना जामीन होत्या म्हणून मोठ्या आपुलकीनं मुलाच्या

वाढदिवसाचं आमंत्रण करायला त्या गेल्या होत्या. एरवी सखुबाई हे बोलल्यासुद्धा नसत्या. पण गटात येऊन त्यांना त्यांचं दु:ख बोलून दाखविण्याचं बळ मिळालं होतं. सविताताईंनाही हे ऐकताना वाईट वाटलं. अस व्हायला नको होतं असं त्यांनाही वाटलं.

**गाव मोठं झालं**

कुसगावात महिला गटात येऊन स्वत:पलिकडे असंच पहायला शिकल्या. गावात राहाणाऱ्या महिलांना डोंगरावरची धनगर वस्ती पण आपलीच आहे असं वाटायला लागलं. कुसगाव तसं डोंगरकुशीतलं गाव! डोंगरावर धनगराची चार घरं ! तसं म्हटलं तर गावातली, पण पार तुटक! गावात गटाची संख्या वाढली आणि डोंगरावरच्या धनगर भगिनीही गटाच्या सभासद झाल्या. महिन्यातनं एकदा त्यांची गावातल्या बायांमध्ये ऊठबस सुरू झाली. एरवी ही आपल्याच का गावातली? असं इतरांना वाटायचं. पाऊस काळात त्यांना डोंगरावरून पार गावात यायचं तर अवघड म्हणून त्यांचे पैसे कुणी कुणी भरू लागली.

एकदा धनगरांची हरूबाई गटात आली. तिच्या शेजारी सरू बसली. ती बोलू लागली ''काय गं तू पण वाण्याचं सामान इथनंच भरतेस का?'' हरूनं फक्त होकार देणारी मान हलवली. सरूला कसंसंच झालं. जिणं किती कष्टाचं असं वाटलं.

थोड्या दिवसातच उन्हाळा असून हरू गटाला आली नाही. सरूला चुकल्या चुकल्यासारखं झालं. तिनं हरूचे पैसे भरले. गटात म्हणाली, ''दिवसभर गावच्या हपशीवरनं डोंगरावर पाणी वाहून दमली असंल, डोंगरावर पाणी न्यायचं थोडं का आहे? बिचारी !'' त्याच महिन्यात सरूच्या पोराचं लगीन ठरलं. नवी सून घरात आली. तिला गाव दाखवत सासवा सुना गावभर फिरल्या तोवर सांजवेळ आली. शेवटी पारापाशी येऊन सरूनं लांब डोंगराकडं बोट दाखवून सुनला सांगितलं , "त्या तिथवर,

लोकं राहातात. तिथं धनगराचं ठाणं, तिथं माझ्या गटातली हरू राहते. तिथवर गाव पसरलाय बघ आपला.''

आजपोतर तिच्याच आळीपर्यंत मर्यादित असणारं गाव आता वाढलं होतं. आणि गावातल्या माणसांच्या मनात जागा मिळाल्यानं धनगराला पण गावात कुणी आपलं राहातं असं वाटायला लागलं आहे.

**बैठक जागजागी बसली, संधी सर्वांना मिळाली**

जुन्या जाणत्या परंपरेचं खोपी गाव. गाव खूप मोठं पण दोन वस्त्यात विभागलेलं. गावात सारं व्हायचं पण एकाच ठिकाणी! त्यामुळे तिथल्या जवळच्या घरातलं माणूसच फक्त हजर राहायचं. गावात गट सुरू करायचं ठरलं त्यावर चर्चा झाली, कुठं जमायचं? ठरलं मंदिरात! नेहमीप्रमाणे दहा बाया जमल्या व्यवहार सुरू झाला. त्याचे फायदे ओळखून अजून गट सुरू व्हायला लागले. पण सर्वांना एकत्र जमणं अवघड वाटू लागलं. मग बैठक बसली. यशोदाबाई म्हणाली, ''माझ्या वाड्यावर बैठक बसवा. ४० बायांना जमवते बघा! हितं यायचं तर आम्ही चारच येऊ''. यावर खूपच चर्चा झाली. आजवर गावात सारं एकोप्यानं झालं! ही तर फुटीची भाषा बोलते असं काहींना वाटलं, सावित्रीनं साऱ्यांना समजून दिलं ''बरं बरं तिथं बसा. पन बायांना आधी एकत्र यायला, व्यवहार करायला तर शिकवून मग साऱ्या गावाला एकत्र करायला शिकू या''. सावित्रीचं पटून साऱ्यांनी होकार दिला. प्रत्येक वाड्यावर आता एक गट भरतो. गावात ७ गट भरतात. जिथं तिथं बसल्यामुळे एकाच वेळी सारे गट गडबड गोंधळ न होता पार पडतात. एरवी गाव मेळाव्याला २५ जणी जमवायलाही खूप कष्ट घ्यावे लागायचे आता ७० जणी मेळाव्याला सहज जमतात. गावातल्या घराघरात पोहोचायचं झालं तर असं काय काय करावं लागतं . त्यामुळे काम शेवटपर्यंत पोहोचवंता येतं आणि साऱ्यांना सामावून घेता येतं.

***

## गट कोणाचा

''३०० रु. ची चूक होतिया. कुनी तरी रक्कम कमी दिली'', गट सुरू होऊन सात-आठ महिने झाले होते आणि अशाच एका बैठकीत गट प्रमुखांनी हे जाहीर केलं. आपसात चाललेला कालवा थांबून गटामध्ये एकदम शांतता पसरली.

''नीट मोजलं का? चार येळेला मोजून आजूबाजूला पाहून झालं, पण तपास लागला नाही.''

''आता या रकमेचं करायचं काय?''

''कुनी गोळा केलं?'' - एक प्रश्न आला.

''मी'' गटप्रमुखांपैकी एकीनं सांगितलं.

''मग तूच भर'' – एकजण म्हणून मोकळी झाली.

''मी ? का म्हणून?सगळं खापर माझ्याच डोक्यावर होय?''

''ध्यान दिलं असतं, तर ही वेळ आलीच नसती,'' -एक गटप्रमुख.

'' पण आता करायचं काय? कुनी भरायचे पैसे.''

''संस्था गट चालवते, तेव्हा संस्थेनंच घ्यायची जबाबदारी.''

संस्थेच्या ताईंनी प्रश्न केला- ''गटात फायदा झाला तर आपण संस्थेला त्यात सहभागी घेणार का? गटाचा फायदा तो संस्थेचा फायदा असं आपण म्हणणार का?'' सगळ्याजणी विचारात पडल्या.मग एकीला आठवलं.

'' गावकीच्या फंडात असा घोळ झाला, तर आपुनच सावरून घेतो. दुसरं कोन येतंया भराया?''

''गटाचा फायदा जसा आपला, तसा तोटा बी आपला'' - एकीनं मत मांडलं.

''१५ रु. प्रत्येकीनं भरले, तर तोटा भरून येईल.'' ताईंनी सुचवलं. १५ रु. भरायचे म्हणजे सगळ्यांनाच जड वाटत होतं. गट आपला, तेव्हा गटाची जबाबदारीही आपली, हेही पटत होतं. विचार करून सर्वांनी तोडगा काढला की १५ रुपये घरून आणून भरायला सगळ्यांनाच अवघड होतं म्हणून ही रक्कम गटातून खर्च झाली असं समजू. साऱ्यांनाच हा तोडगा पटला.

प्रत्येकीला १५ रुपये घालवावे लागले खरे, पण त्यातून गटाची बऱ्या वाईटाची जबाबदारी सभासद म्हणून आपलीच, कारण गट माझा आहे ही जाणीव प्रत्येकीला झाली आणि त्यातून गट जास्त शहाणा झाला, गटाची समज वाढली. ही गोष्ट १५ रुपये पेक्षा नक्कीच ज़ास्त मोलाची होती. गटाची ही घटना सर्व गावोगावच्या गटांमध्ये घडली तशी सांगितली, तेव्हा त्यांनीही त्यातून योग्य तो धडा घेतला, आणि त्यातून तेही गट जास्त शहाणे झाले.

गट म्हणजे आपणच, हे सगळ्याजणींच्या मनात रूजायला लागलं- ही खरी लाखमोलाची गोष्ट.

## आंबवण्याची गोष्ट

जानुबाई बचत गटाची ३ वर्ष पूर्ण झाली. गट चांगला चालत होता. सुरूवातीला ३ वर्षांनी सारे पैसे वाटप करून पुन्हा सुरू करायचे असं गटात ठरवलं होतं. ३ वर्ष झाली. म्हणून हिशोब सुरू झाला. सर्वांनी पैसे जमा केले. पण बायडाबाईचे पैसे काही जमले नाहीत आणि ती पण हजर नव्हती. आता काय? थोडे थोडके नाही तिनं २,५०० रुपये अर्थसाहाय्य घेतलं होतं. पण मागायचं कसं? तिनं तर नवऱ्याच्या इलाजासाठी घेतलं होतं. खूप खर्च केला होता. पण तिनं गडी गमावला होता.तिनं इलाजासाठी

५०,००० रुपये खर्च केले. तरी पन......काय करायचं. गटापुढं प्रश्न पडला. ''तिची बचत १००० रुपये ती वळती करून घेऊ.'' त्यावर पमा म्हणाली ''गट बंद करायचा तर तिच्या वाट्याला येणारं ५०० रुपये व्याज पण वळतं करू.'' तरी १००० रुपये बाकी होते. रखमाबाई म्हणाली, ''जाऊ द्या हो. गटाकडून मदत केली असं समजू . ती पण नडलीच होती ना. तिनं काही त्या पैशावर मजा मारली नाही. अडीनडीला आपण बायांनी तिला आधार नाही द्यायचा तर कुनी द्यायचा? सगळ्यांना मिळून का त्या पैशाचं ओझं होतंय?'' निकाल लागला. साऱ्यांनी होकार दिला. गट संपला. प्रत्येकीला तिची असणारी बचत १००० रुपये मिळाली आणि त्यावर ३ वर्षात जमलेलं ४५० रु. व्याज मिळालं. पुन्हा नव्यानं गट बसला आणि साऱ्यांनी ठरवलं, की महिन्याला बचत २५ रु. ऐवजी आता ५० रु. भरायचे. उत्साह टिकून होता. बायडाबाईच्यामुळे ५० रुपये कमी मिळाले या दु:खापेक्षा कुणाला तरी आपण उपयोगी पडलो, सगळं व्यवस्थिशीर झालं हे सुख त्यापेक्षा मोठं होतं. त्यातून उभारी मिळाली.

## लोकशाहीसाठी ..

''गटात कुनी लहान नाही, कुनी मोठं नाही'' असं सुरूवातीला ठरलं होतं. तरीही ते प्रत्यक्षात यायला वेळ जावा लागतो. गटात घेतले जाणारे निर्णय जेव्हा प्रत्येकीला आपले वाटायला लागतात, तेव्हाच गट सगळ्यांचा हे प्रत्यक्षात येतं. भरतवाडीत हे कसं झालं याची गोष्ट मोठी मजेदार आहे.

भरतवाडीतला एक गट नेहमी एकाच सदस्य महिलेच्या घरात भरायचा. ती महिला शिकलेली असल्यामुळं गटप्रमुख. पण त्यामुळं गटात तिचाच शब्द चालायला लागला. कुणाला उचल द्यायची, किती द्यायची हे तिच्या सल्ल्याशिवाय ठरेनासं झालं. एकेकीला तिचं वागणं खटकायला

लागलं. कारण गटाचा सगळा कारभार तिच्याच हातात. बरं, बोलावं तरी पंचाईत, कारण गटाची बैठक तिच्याच घरात भरायची. आपसात बोलून महिलांनी यावर उपाय शोधला. त्यांनी गटाची जागाच बदलून टाकली आणि मग प्रत्येकीला दडपणाशिवाय आपलं मत मांडायची संधी मिळायला लागली, म्हणजे लोकशाही रूजायला लागली. अशी लोकशाही रूजण्याची हिंमत येते, तेव्हा हा गटाला वळण लागत असतं.

## जबाबदारी पाहावी घेऊन

आंबवणं गावात गट सुरू झाले. खालच्या आळीच्या शालनताई तळेकर गटासाठी गावात जायच्या. सुरूवातीला त्यांना काहीच माहित नव्हतं. गटाचे व्यवहार काय, आणि कसे चालतात, आपलं मत वेगळं असलं, तरी ते मांडायला त्यांना दबाव वाटायचा. पण गटाचे व्यवहार बघता-बघता, त्या शिकल्या, व्यवहार कळायलाही लागले आणि हिंमतही वाढली. आणि मग जबाबदारी पाहावी घेऊन, असं म्हणत त्यांनी इथल्या महिलांना जमवलं आणि नवीन गट सुरू केला. आता तर खालच्या आळीला सुरू झालेले चारही गट नीट चालतात ना हे स्वत: त्या जबाबदारीने बघतात. गटातल्या महिलांसोबत बँकेतही जातात. त्यांच्या अडचणी दूर करतात.

गटातली जबाबदारी, दुसऱ्या कोणाला तरी बघावीशी वाटणं, ती दुसऱ्या गटांपर्यंत पोहोचवणं हेही गटाला वळण लागायचंच लक्षण.

## गोष्टी बोलू शहाणपणाच्या चार

सिंहगडाच्या पायथ्याशी वसलेलं रहाटवडे गाव. त्या गावात चालणारा शांताबाईंचा आदर्श गट.

लहाणपणीच त्या लग्न होऊन गावात आल्या. शिक्षण तिसरी. पण पहिल्यापासून सामाजिक कामाची खूप आवड. आपला संसार करता

करता दुसऱ्याला मदत करायला पायजे असं त्यांना सारखं वाटायचं. त्यांच्या मालकांनी पण साथ दिली. म्हणून मग लेप्रसी टेक्निशिअनचा ४० दिवसांचा कोर्स केला आणि आरोग्य सेविकेचं काम करायला सुरूवात केली.

म्हणजे, त्यांनी मदत करायची संधी शोधली. मनात होतं, ते प्रत्यक्षात आणायची धडपड केली. म्हणूनच पंचायतीत काम करण्याची संधी पण चालत आली. गेली २०-२५ वर्ष पंचायतीत बिनविरोध निवडून येत होत्या.

खरं तर आरोग्य सेविकेचं काम, पंचायतीतलं काम यातून शांताबाईंनी कितीतरी लोकांना मदत केली होती. पोस्टाची बचतीची खाती उघडायला लावून बचतीचं वळणसुद्धा लावलं होतं. तरी बचत गटाची वेगळी जबाबदारी त्यांनी घेतली.

त्या सांगत होत्या '' बचत गटाची ताकदच येगळी. सारं करत होते पण आधी कुणाची पैशाची नड मला भागवता येत नव्हती. गावात बचत गट सुरू झालं, अन् नड कशी भागवायची, हे बायांना शिकवायचा रस्ता दिसला. त्यातून गटाचं येगळंपण असं, की गटामधी पैसा खेळता राहतो आणि सगळा पैसा बायांच्याच हातात रहातो. गटाच्या बायामान्सांना उपेग होतो.''

''आमच्या भागात पूर्वी सावकारी फार ! महिन्याला १०% नं उचल घ्यायला लागायची. त्यापायी कितीकांच्या जमिनी गहाण पडल्या. आता गटामधून लहान मोठी उचल मिळाया लागली. त्यामुळं गावातली सावकारी कमी झाली. बायांनी स्वत: च्या नावावर घरासाठी काय-काय घेतलं ! कुणी घरावर पत्रे घालून घेतले, कुणी घरात गॅसच्या शेगड्या तर कुणी कुकर घेतला. त्यातून बायामाणसांचे कष्ट कमी झाले, अन् घरादाराला मदत व्हायला लागल्यामुळं घरातला मान वाढला, बाईच्या शब्दाला

किंमत आली.''

अशा या शांताबाईंचा गट चालतो तरी कसा?

''असं बघा गटाला वळण चांगलं हवं. आमच्या गटाचं वळण चांगलं. म्हणूनच आमचा गट एक नंबरचा. गटामधी नुसत्या पैशाच्याच गोष्टी झाल्या म्हणजे गटाचं वळण बिघडतं. म्हणून आमच्या गटात आम्ही पैशाचे व्यवहार पहिले उरकून घेतो. वस्तीवरच्या लिहिता-वाचता येणाऱ्या एकाला हिशेबासाठी हाताशी घेतो. आमच्या गटात समजूत आन् इस्वास चांगला, त्यामुळं काम पटकन् उरकतं.''

''चार महिला जमल्या की भांड्याला भांडं लागतंच म्हणून समजा. आमच्या गटात आम्ही सगळ्याजणी मोकळेपणानं बोलतो, कुणाच्या घरातल्या अडचणी, कुणाचं औषध-पाणी, कधी एकमेकीतल्या , तर कधी सास्वासुनांच्या कुरबुरी- गटात समजूतीच्या चार गोष्टी कानावर पडतात, जरा शहाणपण येतं, त्यानंच गटाचं वळण चांगलं राहतं. हे सारं ध्यान देऊन करायला लागतं. ते मी बघते म्हणून तर मला प्रमुख म्हणत्यात.''




'' मला काहीतरी चांगलं करायचंय, पण मला साथ मिळत नाही,'' असं म्हणणाऱ्या कितीतरी जणींपैकी एक शांताबाई. त्यांच्या अंगच्या (उपजत) गुणांना गटाची साथ मिळाली आणि मग त्यांनी घालून दिला, आदर्श गट कसा असावा त्याचा धडा.

***

## गट तसे गाव

गावोगाव आपले गट पसरले. मोठ्या गावांमध्ये १२-१५ तर लहान गावामध्ये ३-४ असे गट सुरू झाले. म्हणजेच लहान गावामध्ये ६०-७० महिला, तर मोठ्या गावामध्ये २०० ते ३०० एकत्र जमायला लागल्या.गटांची गावातली ताकद वाढली.चांगल्या कारणासाठी दबाव आणायची एकी आणि हिंमत महिलांमध्ये आली, तर काय होतं, त्याची ही उदाहरणे.

### आमची गटबाजी !

गावामध्ये नवीन हातपंप बसवला संस्थेच्या कार्यकर्त्यांनी. हातपंप कसा काम करतो ते समजून दिलं. बजावलं. हातपंपावर धुणी धुवायची नाहीत. नाहीतर धुण्याचं पाणी जमिनीत मुरेल आणि पाणी खराब होईल.

पण काय करणार. धुवायची विहिर खूप लांब होती. मग रखमा मनात म्हणाली मी एकटीनं तिथं धुणं धुतलं तर काही बिघडंत नाही आणि तिनं तिथंच धुतलंन् चार बायकांनी ते पाहिलं. तिला तिथं धुणं धुवायचं नाही हे सांगितलं. पण तिला पटेना. रात्री गटांची बैठक होती. त्यात हा विषय झाला आणि गावातल्या सर्व गटांनी नियम केला की गटातल्या 'कुणी बाईनं तिथं धुणं धुवायचं नाही आणि कुणाला धुवू न द्यायचं नाही.' गावच्या आरोग्याचा प्रश्न आहे. नाहीतर त्या पाण्यानं आजार यायचा. दुसरा दिवस उजाडला . रोजच्यासारखी सरूबाई पुन्हा हपशावर धुवायला गेली. ठकुबाईनं पाहिलं तिनं सावित्रीला बोलावलं. ती रंजनाला घेऊन आली. तोवर ताराबाई तिथं पोहोचली. काय झालं बघायला अजून चार जणी जमल्या. तरी सरू ऐकेना मग मात्र एक जण

पुढं झाली आणि तिनं चारचौघींसमोर सरूचं धुतलेलं धुणं चिखलात टाकलं आणि म्हणाली ''तुझ्या पोराचं पण त्यानंच भलं होणार आहे. गटाचा नियम आहे!''

गट नसंता तर कुणा एकीची अशी हिंमत झाली नसती. पण गटामुळे चांगलं करायला पण बळ मिळतं. एका दुकटीनं न जमणारं काम गटामुळे सहज जमतं.

## गटाची उचल गावाला

गटातल्या महिला अडीनडीला गटाकडून उचल घेतातच, त्यात नवल ते काय?पण हळूहळू गटाची ताकद वाढायला लागली. गटाच्या हातात पैसे खेळायला लागले. तशी गावांची गटाकडे पाहण्याची नजर बदलली.

तोरणा किल्ल्याच्या कुशीतल्या गावात दर वर्षी होणाऱ्या जत्रेची तयारी करताना गावकीला लक्षात आलं की बाजाची पेटी(वाजवायची) घ्यायची तर पैसे कमी पडत आहेत. मग मदत मागायची कुणाकडे? तर गटाचं नाव डोळ्यापुढं आलं.' गावच गटाला म्हणतोय ५००० रु. द्या. ८ महिन्यात व्याजासह परत देतो. महिलांनी चर्चा करून द्यायचं ठरवलं आहे, बघूयात प्रत्यक्षात काय होतय ते?

## ससेवाडी बदलाची कहाणी !

ऐका मंडळी! सुनांनो-सासवांनो, पोरीबाळींनो, समद्यांनी ससेवाडीची कहाणी ऐका. डोंगराच्या कुशीतलं ससेवाडी गाव तसं चांगलं पण तरीसुद्धा अडलं नडलं सावकारीनं! गावात सावकार यायचे ''तुला किती?'' म्हणून विचारायचे, सगळ्यांना पैसे वाटायचे. नुसते नाय बरका, चांगले१०% टक्यांनं.

त्यामुळे जेवढी उचल घ्यावी तेवढा कर्जाचा डोंगर मोठा होणार.

कर्ज फेडण्यासाठी कितीकांचं घरचं आणि दारचं काय काय सावकारांपाशी गहाण पडलं, कित्येकींचे दागिने मोडले, तर कुणाची नक्षत्रासारखी गुरं विकावी लागली, कुणाच्या वावराचा तुकडा गेला आणि आता मजुरी करत वणवण फिरणं नशिबी आलं. कुणाला पोरीच्या लग्नाचा खर्च करायची ऐपत नाही म्हणून किती जणींच्या लेकी बाळींना बिजवर नवरे करायला लागले.

सावकारीचा विळखा, त्याचा फास सगळ्यांनाच. पण सावकाराकडून उचल तर घ्यायला लागायचीच. अडीनडीला दुसरा कोणताच आधार नाही, करणार काय?

एक दिवस ससेवाडीच्या महिलांची बैठक बसली. संस्थेच्या ताईंनी त्यांना बचतीची माहिति दिली, एका म्हणीची आठवण करून दिली '' थेंबे थेंबे तळे साचे.'' तशी काहीजणींनी हिंमत बांधली, आणि बचतगट सुरू केला.

सुरुवातीला महिला बैठकीला निघाल्या म्हणजे घरातून विचारायचे 'कशाचा गट'. पण हळूहळू घरच्या सगळ्यांना कळायला लागलं, की बचतगटाचा आपल्या अडीनडीला आधार होतो. कुणाचं आजारपण, कुणाचं शिक्षण, कुणाच्या घरचे लग्नकार्य उरकते. त्यामुळे जसजसे दिवस जात गेले तसतसे गट तयार होत गेले. बचतगटांना मदत करणाऱ्या संस्थांकडून मोठी कर्ज घेण्यासाठी मदत मिळायला लागली. बायकाबायका मिळून हजाराच्या घरातल्या रकमा हाताळायला शिकल्या. ४ वर्षांत ससेवाडीत १०,००० पेक्षा जास्त पैसे हाताळणाऱ्या कमीत कमी ७० जणी तरी आहेत. गटातून पैशाची येवढी मदत झाल्यामुळे घरच्यांची तोंडं आपसूक बंद झाली.

आता घरातली गडीमाणसंच भुणभुण लावतात 'गटातून काय सोय हुती का ते बघ.' आधी घरातून बाहेर पडायचं,चार पावलं जायचं तरी

मुश्किल, आता गटामुळं गावात बायका बाहेर पडायला लागल्या. गावातली ग्राम पंचायत सात जणींची झाली आणि त्या महिलांनी पंचायत स्वतः चालविली. गावातल्या बायांचा आधार त्यांना होता.

थोडक्यात म्हणजे महिलांनी स्वतःच्या घराला आधार देता देता, स्वतःसाठी पण कितीतरी गोष्टी शिकून घेतल्या. पैशाचा व्यवहार, चार जणीत मिळून -मिसळून वागणं, धिटाईनं बोलणं, एकमेकींना समजून घेणं. गावात गटाची ताकद निर्माण झाली. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे गावातून-सावकार हकालपटट्टी झाली. हवी तेव्हा मदत घ्यायला, स्वतःचं मन मोकळं करायला हक्काची जागा झाली आणि त्यातून ज्याचं मोल पैशात मोजता येणार नाही अशी एक गोष्ट मिळाली. **ती म्हणजे बायकांना स्वतःचा विश्वास मिळाला.**

ससेवाडीतल्या गटांचं नाव बँकेच्या अधिकाऱ्यांपर्यंत पोचलं. त्यांनी गटांना भेट दिली आणि बधितलं, सगळे व्यवहार महिलाच बिनचूक आणि शिस्तीनं करतायत. घेतलेली उचल जोखमीनं परत करतायत. गटाचं वळण तर त्यांना मोठ्या कौतुकाचं वाटलं, कारण महिलांनीच गटात कसं वागावं याचे नियम आणि नियम मोडणाऱ्यांसाठी दंडसुद्धा ठरवले होते. बँकेच्या अधिकाऱ्यांना गटाचा विश्वास वाटला. लाखालाखांच्या उलाढाली करणाऱ्या प्रमुख बायका खात्यातले पैसे काढतात आणि व्यवहार करतात हे त्यांनी पाहिले. गटातल्या काही बायका स्वतःच्या हिंमतीवर उद्योग करायला सुद्धा तयार आहेत असं बघून त्यांनी गावाचं नाव महाराष्ट्र ग्रामीण पतपुरवठा कार्यक्रमात घेतलं. आणि गटांना लाखांच्या घरातली मदत देऊ केली. ही बायकांच्या गटांची करामत बघून आता गावातल्या पुरुषांनी सुद्धा त्यांचे बचतगट सुरू केले आहेत.

## गटानं आणली गावाला योजना

मुख्य रस्त्याच्या आतल्या बाजूला असलेलं ससेवाडी. डोंगराच्या

कुशीतलं गाव म्हणून गावकऱ्यांनी इथं संस्थेच्या मदतीनं शेतीसाठी बांध बांधून पाणी अडवण्याचं आणि पाणी जिरवण्याचंही काम केलेलं आहे. त्यामुळेच फॉरेस्टचे अधिकारी वनीकरणाची योजना घेऊन गावात आले. योजना गावात द्यायची तर आधी मिटींग लावून योजनेची माहिती सांगितली पाहिजे, म्हणून गावातल्या पुरूषमंडळींशी बोलणे केले. त्यावर पुरूषमंडळी म्हणाली- 'आमच्या गावात बाप्ये नाय जमत . बायाच गटासाठी म्हणून जमत्यात. बाप्यांना बोलावलं तर कुनीच जमायचं नाय, त्यापरीस बायांनाच बोलवा. ' सरकारी अधिकारी चकीतच झाले. 'गावातले कर्ते सावरते बाप्ये जमत नाहीत, तर घराबाहेर न पडणाऱ्या बाया काय जमणार आणि त्यांना काय समजणार. तरीसुद्धा घरोघर बोलावणी पाठवली. आणि काय नवल, १५-२० मिनिटात ३०-४० जणी जमल्यासुद्धा. त्यांच्याशी बोलताना सरकारी अधिकारी यांना अजूनच धक्का बसला. सगळ्याजणी व्यवस्थित बोलत होत्या. विचारलेल्या प्रश्नांची नीट उत्तरे देत होत्या. गावातल्या कामांची त्यांना माहिती होती. 'ज्या गावातल्या महिला एवढ्या हुशार तिथं योजना नक्कीच चालणार. 'असं म्हणून अधिकाऱ्यांनी गावासाठी योजना मंजूर करून टाकली. गटानंच त्यांना गावासाठी पुढाकार घेण्याची हिंमत दिली.

## गावाला लागलं गटाचं वळण

### चांगलं काम करायलाही धाडस लागतं!

महिलांच्या विकासाची चर्चा सुरू झाली की दारूबंदीचा प्रश्न नेहमी ठरलेला असतो. पण आंदोलन करून हा प्रश्न तात्पुरताच सुटतो बंदी कायम टिकत नाही.

असंच झालं खोपीमध्ये! एकजणाने हातभट्टीची दारू विकायला सुरूवात केली. बातमी गावभर पसरली. साऱ्यांजणींनी बैठक घेतली. दारू

विक्री करणाऱ्याला जाऊन भेटायचं ठरलं. सकाळी काही जणी जमल्या. जमल्या तेवढ्या सगळ्या बायकांनी त्याची गाठ घेतली. त्याला समजून दिलं - पुन्हा गावच्या हद्दीत दिसायचं नाही असं खडसावलं. याचा नक्कीच उपयोग झाला. गावात महिलांची रात्री पुन्हा बैठक बसली सकाळी हजर नसणाऱ्यांची हजेरी घेतली, पैशाच्या फायद्यापुरतं गटात यायचं असलं तर खाती बंद करा असं त्यांना गावातल्या प्रमुखांनीच सांगितलं. न गेलेल्या सभासदांना खूपच अपराधी वाटलं. कधी चांगलं काम करायलाही धाडस लागतं. एकटी दुकटीनं न जमणारं काम अनेक गटांमुळेच जमतात.

**देवाला साकडं**

कुसगावात काकड आरतीचे दिवस आले तरी बाया आरतीला जमेनात. २ दिवस झाले मग गावातल्या पुढाऱ्यांची गटप्रमुखांची बैठक घेतली. "का आरतीला येत नाही?" असं विचारलं. गटप्रमुखांनी एक मुखानं उत्तर दिलं, "महिनाभर गावातले दारूधंदे बंद झाले तरच आम्ही आरती करू," पुढाऱ्यांनी मान्य केलं. पहाटेची काकड आरती सुरू झाली. कधी कधी देवालाही असं साकडं घालावं लागतं, तरच तो पावतो.

## आमची ताकद ! गटाची ताकद !!

यकटी दुकटी नव्हं, वरव्यातल्या ५६ जणींनीं दोन दिवस रत्नागिरी, पावस, डेरवण, अशी कोकणची सहल स्वतःची पदरमोड करून काढली. यात खरं नाव म्हणाल तर तिथल्या उजाताई शिंदे आणि गंगूताई भोरडे यांचं. त्यांनीच कुठं जायचं, कधी जायचं ते सारं ठरवलं. हिंमत धरून दोघीच बसं डेपोत गेल्या आणि आख्खी बस प्रवासासाठी ठरवून आल्या.

वरवे गावात रहाणाऱ्या उजाताई शिंदे यांचं शिक्षण सातवीपर्यंत झालेलं. १०-१५ वर्षांपूर्वीच दारूड्या नवऱ्याशी पटत नाही म्हणून लहान लेकीला घेऊन उजाताई माहेरी वरवे गावात आल्या. स्वतःच्या हिंमतीवर

थोडी तरी कमाई करता आली पाहिजे असं उजाताईंना वाटलं. त्यांनी मग दोन कोर्स केले - एक बालवाडीचा आणि एक आरोग्यसेविकेचा. बालवाडीचा कोर्स केल्यामुळे गावातल्या शाळेत त्या शिक्षिका म्हणून शिकवायाला लागल्या.

'हक्काची कमाई झाली, बास झालं 'असा स्वतःपुरताच विचार करून उजाताई थांबल्या नाहीत.सामाजिक कामाची त्यांना पहिल्यापासूनच आवड, त्यामुळे आरोग्यसेविका म्हणून त्या मोठ्या आवडीने काम करतात. कोणत्याही चांगल्या कामासाठी त्या कुणाची वाट बघत नाहीत. सहलीचच उदाहरण घ्या -सहलीसाठी बस ठरवायला बस डेपोत जायचं, तर 'दोघीच कशा जाऊ ? चौकशी कशी करू?' म्हणून त्या अडून बसल्या नाहीत. 'देवानं तोंड दिलंय की,' असं म्हणून पुढाकार घेऊन त्यांनी सगळं ठरवलं. या वागणुकीमुळेच गावात त्यांना सगळ्यांचं प्रेम आणि विश्वास मिळालेला आहे.

प्रबोधिनीने महिलांची सहल दिल्लीत काढली होती. या सहलीला जाऊन त्या दोघींना खूप शिकायला मिळालं. दिल्ली सहल गावातही खूप गाजली. महिलांचे गट दिल्ली सहलीला गेले हे ऐकून - पाहून वरव्यात भराभरा गट सुरू झाले. एक-दोन-चार-चौदा ते थेट बावीस पर्यंत आणि ते सुद्धा २ वर्षात. गट एकीकडून दुसरीकडे, दुसरीकडून तिसरीकडे असे साखळीसारखे पसरत गेले.


वरव्याच्या गटांचं हेच तर वेगळपण आहे, तिथे बहुतेक सगळ्या गटांची तारीख आणि वेळ एकच आहे. आपापल्या घरचं आटपून सगळ्या गटांच्या महिला एकाच वेळी पण वेगळ्या ठिकाणी गटाचं काम सुरू करतात. स्वतःच्या 'अचानक बचत गटाची' बैठक थोडी लवकरच आटपून उजाताई, आणि त्यांच्याचसारख्या गावाच्या भल्यासाठी झटणाऱ्या गंगूताई अशा दोघीजणी गटागटांवर जातात. प्रत्येक गटाचे हिशोब 'कॅलक्युलेटर' च्या मदतीनं तपासून

देतात. महिलांमधे त्या दोघींच्या शब्दाला किंमतही आहे, आणि सगळ्यांचा विश्वासही आहे. त्यामुळे गटातल्या महिलांच्या अडचणी त्या सोडवतात.

गटात नुसते पैशाच्या देवाण - घेवाणीचे व्यवहार झाले, तर गटाची ताकद पुरेशी वापरली जाणार नाही, हे उजाताईंनी बरोबर ओळखल. बचतगट म्हणजे पैशाची देवाण-घेवाण , एकमेकींना आधार हे आणि त्याहीपलीकडे - गावाच्या विकासात महत्त्वाचा वाटा उचलणारी ताकद , दबाव-गट, हे उजाताईंनी ओळखलं ,आणि त्याचा सगळ्यांच्याच भल्यासाठी उपयोग केला, म्हणून वरव्यातल्या गटांची इतकी प्रगती झाली . गावालाही महिलांची ताकद पहिल्यांदाच कळली.

गटात नुसते पैशाच्या देवाण-घेवाणीचे व्यवहार झाले, तर गटाची ताकद पुरेशी वापरली जाणार नाही, हे उज्ज्वलाताईंनी ओळखलं आणि नियम केला की गटातल्या प्रत्येक बाईला कमीत-कमी आपली सही करता आली पाहिजे, आणि हळूहळू स्वतःचं पुस्तक वाचता आलं पाहिजे .त्यामुळे बैठकीच्या रात्री गटागटामधून महिला लिहा-वाचायला शिकतायत आणि शिकवतायत असं छान दृश्य बघायला मिळतं.''

***



## नव्या दिशा

स्वत:साठी कशीबशी २५ रुपये महिन्याला बचत करायची या कल्पनेपासून या व्यवहाराला सुरूवात झाली. उलाढाली वाढू लागल्या तसतसा विश्वास वाढू लागला. बचत गटाच्या बैठकींमुळे नुसत्याच पैशाच्या उलाढाली वाढल्या असं नाही तर एकूणच महिलांच विश्व मोठं झालं, मग मात्र या उपक्रमाला निश्चित अशी दिशा मिळाली. यातून महिलांच कर्तृत्व विविधांगांनी फुलेल असा प्रबोधिनीलाही विश्वास आला. स्वयंपूर्णत्तेकडे वाटचाल करताना अनुभवी गटांनी काही पुढच्या दिशा दाखवल्या.

### महिला बचत गट : एक माध्यम

बचत गटाच्या निमित्तानं महिला एकत्र जमतात आणि बचत गटाचे व्यवहार शिकता - शिकताच, त्या वेगवेगळे विषय हाताळायला शिकतात. **बचत गटाच्या** या निमित्ताने माहिती घेतात. स्वत:च्या, स्वत:च्या पोरांबाळांच्या, कुटुंबाच्या आरोग्याबद्दल. एरवी महिला स्वत:च्या तब्येतीच्या तक्रारी सांगत नाहीत. बायकांचा जन्मच सोसण्यासाठी असंच स्वत: महिला आणि आजूबाजूचेही म्हणत असतात. या गटांचे प्रमुख फक्त बचतीचंच काम बघत नाहीत, तर **आरोग्य** प्रकल्प गटातल्या प्रत्येक महिलेपर्यंत पोचवण्याची धडपड करतात. प्रबोधिनीच्या मदतीनं बचतीबरोबरच आरोग्याचेही धडे गिरवतात.

इतर ठिकाणीही कधी **बचत गट उद्योगासाठी**, जमून मोठ्या भांडवलाच्या उलाढाली करतात, तर कधी **पाणलोट विकासाच्या निमित्ताने** जमणारे गट पाण्याच्या वापराच्या विषयी पाणलोट यांची माहिती देण्यासाठी गटाचा माध्यम म्हणून उपयोग केला जातो. या निमित्ताने महिला शक्ती जागृत होते व चांगल्या गोष्टीसाठी वापरली जाते आणि

त्यातून महिला विकास होतो त्यामुळेच वेगवेगळ्या सरकारी योजनेत याचा समावेश केला आहे.

## उद्योगी हाताला – शासनाचं पाठबळ

**दारिद्र्य निर्मूलनासाठी** गावांमध्ये रोजगार निर्माण व्हावा, उद्योग सुरू व्हावेत यासाठी महिलांना मोठमोठ्या रकमेचा कर्जपुरवठा करणाऱ्या 'महाराष्ट्र ग्रामीण पतपुरवठा योजना' आणि स्वर्णजयंती रोजगार योजना शासनाने कार्यान्वित केल्या आहेत. अशा योजनांमुळे दोन गोष्टी होतात – मोठ्या रकमा हाताळण्यासाठी महिलांची तयारी होते आणि बँक आणि इतर सरकारी यंत्रणा कसे काम करतात याचा जवळून परिचय होतो. योजनांमध्ये महिला बचत गटांना खूपच महत्त्व आहे. सर्व कर्ज व्यवहार हा गटाद्वारे सभासदांशी होतो व त्यांना उद्योगाचे प्रशिक्षण दिले जाते. त्यासाठी, दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील महिला असणे ही अट आहे. या योजनांमुळे खूप मोठमोठे व्यवहार घडू शकतात परंतु जर गटातील महिलांची तयारी, हे सारे पेलण्याइतकी झाली नसली तर मात्र खूपच मोठा धोका असतो. एक तर गावातील पुरुषच महिलांच्या नावाने परस्पर व्यवहार करतात किंवा ह्या योजनांमधून मिळालेले पैसे योग्य प्रकारे वापरले जात नाहीत.

शासनाचे पैसे योग्य प्रकारे कारणी लावण्यासाठी रूळलेले अनुभवी बचत गट, उलाढाली करणारे बचत गट हाच चांगला मार्ग आहे यावर शासनाचा विश्वास बसला आहे. आता तो विश्वास सार्थ करण्याची जबाबदारी अशा योजनेतल्या गटांची आहे.

## जिजामाता प्रबोधन समिती

एखाद्या गावामध्ये एकापेक्षा जास्त गट सुरू झाले म्हणजे प्रत्येक गटात काय चाललंय हे माहीत होत नाही. जर गटांची संख्या ८ पेक्षा

जास्त झाली तर गावावर परिणाम करणारं काम त्यातून घडू शकतं असं लक्षात आलं. त्यामुळे जास्त गट असणाऱ्या प्रत्येक गावात प्रबोधिनीने अशी महिला गट प्रमुखांची समिती स्थापन केली. तिला नाव दिलं **जिजामाता प्रबोधन समिती.**

कुसगाव मध्ये अशी समिती १९९७ साली प्रथम स्थापन केली. आता अशी समिती १४पेक्षा जास्त गावात आहे. ही समिती महिन्यातून एकदा जमते.

कुसगावमध्ये एका पाठोपाठ एक असे ११ गट सुरू झाले. इतर गटात काय चालतं ते प्रत्येक गटात माहिती व्हावं म्हणून गटांमधून महिलांची निवड केली. अशा १५ जणींची बैठक दर महिन्यातून एकदा मंदिरामध्ये घ्यायला प्रबोधिनीने सुरूवात केली. गटांमधून कुणा कुणाला, कुठल्या कारणासाठी, किती अर्थसाहाय्य दिलं, कुणाच्या परत फेडीमध्ये काही अडचणी येतात का?, अशा विषयावर या बैठकीत चर्चा होते. त्यातून एखाद्या गटाची उरलेली बचत दुसऱ्या गटाला कर्ज म्हणूनही दिली जाते. या व्यवहाराची सवय झाल्यावर मग मात्र ही बैठक नुसती व्यवहारापुरती मर्यादित राहिली नाही. गावाच्या महिला विकास उपक्रमांची चर्चाही या बैठकीत करू लागल्या.

वेगवेगळ्या गावात या अशा बैठकीमुळे खूप काय काय घडू शकलं. अशाच बैठकीमधून **खोपी गावच्या महिलांनी सहल ठरवली,** तर **कांजळ्याच्या महिलांनी गावमेळावा ठरवला** - त्या मेळाव्यांची सारी योजना महिलांनीच बैठकीत केली आणि मेळावा पार पडला. **अवसरवाडीत आरोग्य तपासणी ठरवली** तर **सणसवाडीत पशु उपचार शिबिर ठरवलं**. आता महिला गावच्या विकासाच्या चर्चाही त्यात करू लागल्या आहेत **आणि किती गावात काय काय ठरलं.**

या सगळ्यातून गट प्रमुख असणाऱ्या महिलांची, गटव्यवहाराची समज चांगली वाढली आहे. त्या एकत्र येऊन आपल्या गटापुरताच नाही

तर सगळ्याच गटातील सभासदांच्या वाढीचा विचार करू लागल्या आहेत. या साऱ्यातून त्यांचं कर्तेपण वाढतयं हे मात्र खरं !

## बदलली दिशा राजकारणाची

वरवे गावात गेली कित्येक वर्षं एकाच पक्षाचं सरकार आहे. निवडणुका जवळ आल्या. तशी गावात जोरदार हालचाल सुरू झाली. 'महिलांच्या गटांचं ' नाव पार पुढाऱ्यांपर्यंत पोचलं होतं. त्यामुळे या खेपेला खुद्द पुढारी, उज्ज्वलाताईंची भेट घ्यायला गावात आले, अन् आमच्या पार्टीला निवडून दिलं तर गावाच्या आणि महिलांच्या विकासाची कामं करून देऊ, असा शब्दही दिला. उजाताईनी विचार केला, यांनाही संधी द्यायला काय हरकत आहे? लगोलग त्यांनी सगळ्या गटांची बैठक बोलावली, आणि सगळ्या महिलांना सांगितलं ''पहिल्याच बारीला पुढारी बायामान्सांकडं आलेत. आपली काम करून देणार म्हणून शब्द बी दिलाय, तर या वर्षी त्यांना संधी द्यायला हवी.'' महिलांना हा विचार पटला, त्यांनी विचारलं, ''उजाताई काय करायचं ते सांगा.'' उजाताई म्हणाल्या ''घरचे आपल्याला सांगतील त्यांना 'हो ' म्हणायचं, पण मतदान केंद्रात आतमधे जाऊन हवा तिथंच शिक्का मारायचा. त्यासाठी सकाळी ७।। ला सगळ्यांनी शिक्का मारायला रांग लावायची.''

दुसऱ्या दिवशी पुरुषांच्या आधी सगळ्या महिलांचं मतदान झालं. बायकांचं ऐकून पुरुष म्हणाले ''आपल्या घरच्या बायकांनी वेगळं मत दिलंय, तर आता आपण बी तेच करू,'' इतक्या वर्षात जे कधी झालं नव्हतं ते घडलं गावची जुनी पार्टी जाऊन, गावात नवीन राज्य आलं, बचतगटाच्या बायांनी राजकारणाची दिशा ठरवली. आता म्हणायचं का ''बायकांची अक्कल चुली पुढंच म्हणून ?''

## दिशा भांडवल गटाची

प्रत्येक सभासदाचे महिन्याला २५ रुपये गोळा करून दर महिन्याला बचत रूपाने ५०० रुपये जमतात त्यात व्याजाची भर पडते, परतफेड जमा होते पण तरी तीन, चार वर्षांनंतरही महिन्याची जमा काही ३५०० पेक्षा जास्त जमेना. ही रक्कम थोडीशी वाटू लागली. या कमी पडणाऱ्या रकमेमुळे गटा गटामध्ये वादावादी सुरू झाली. धड कुणाचीच गरज पुरेशी भागेना कारण सोप्या पद्धतीने व कमी दरानं पैसे मिळत असल्यामुळे त्या उचलीच्या भरवशावर आता पैशाची कामं बेतली जाऊ लागली होती. ह्या अडचणींवर सभासदांनीच उपाय काढला. गटावरचा विश्वास वाढल्यावर महिन्याला २५ ऐवजी ५० रुपये बचत, १०० रुपये बचत अशी करायला सुरूवात झाली. त्यामुळे व्यवहार मोठ्या रकमांचे व्हायला लागले. त्यातून खात्रीशीर कामे होऊ लागली. मग मात्र शिवापूरच्या कान्होपात्रा थोरातांनी ह्यामध्ये 'भांडवल गटाची' संकल्पना मांडली. ज्यांना मोठ्या उलाढाली करायच्या आहेत, जोखमीची कामं करायची आहेत, उद्योग करायचा आहे त्यांनी महिन्याला २०० रुपये बचत करायची आणि म्हणता म्हणता गट तयार झाला. त्याचं नाव ठेवलं 'श्री भांडवल गट.' वर्षभरात त्यातून एकरकमी ५,००० रुपयांचे एकरकमी अर्थसाहाय्य घेणाऱ्या १५ जणी तरी आहेत. त्याशिवाय किरकोळ अर्थसाहाय्य वाटपही झालेच. या गटाचे यश बघून इतरही काही गावांनी ही कल्पना उचलून धरली. सणसवाडीमध्ये याच धर्तीवर एक अभिनव प्रयोग महिलांनी करायचा ठरवला. महिन्याला प्रत्येकी ५०० रुपये जमा कराचे व त्यातून प्रत्येकीनं एक म्हैस खरेदी करायची. गटाला सुरूवात झाली. त्याच नाव ठेवलं 'गोधन बचत गट'.

करायला लागलं की जमायला लागतं, जमायला लागलं की नवीन सुचायला लागतं आणि त्यातूनच विविध कल्पना मूळ धरतात. मग कुणी

याला 'सबसिडी मिळते का?' या प्रश्नावर अडून बसत नाही. आलात तर तुमच्या बरोबर, नाही आलात तर तुमच्याशिवाय ! पण आम्ही पुढं जाणार हे नक्की आहे, असा विश्वास स्वत:च्या हिंमतीमुळे येतो.

## पतसंस्था

गटांमधून आणि सरकारी योजनांमधून महिला वेगवेगळ्या प्रकारचे, मोठ्या प्रमाणातले आर्थिक व्यवहार करायला शिकत आहेत. या व्यवहारांची पुढची पायरी म्हणजे पतसंस्था किंवा महिलांची सोसायटी. पतसंस्थेचं काम म्हणजे लोकांना, संस्थांना कर्जपुरवठा करणे. आतापर्यंत पतसंस्थेचं काम म्हणजे पुरूषांचंच काम. महिलांनी चालवलेली पतसंस्था ही कल्पना महिलांनाही नवी वाटली आणि गावालाही नवी वाटली. गटाचे व्यवहार २० जणींचेच, तर पतसंस्थेचे व्यवहार खोरे पातळीवरचे. गटातल्या तिघी गटप्रमुखांनी मिळून भावकीतल्या महिलांचेच व्यवहार बघायचे,तर पतसंस्थेत गावातली, आजूबाजूची पुरुषमंडळी, गावातल्या संस्था, निरनिराळी मंडळं, यांच्याबरोबर व्यवहार बघायचे. त्यासाठी हिंमत पाहिजे,हुशारी पाहिजे आणि व्यवहार चोख पहाण्याची कुवत पाहिजे. आता महिला स्वतःची परीक्षा करून बघणार आहेत, की कुठवर आलो आहोत आपण? किती शिकलो? आपली ताकद किती?

चुका होतील याची तयारी आहेच या महिलांची, पण एकेक चूक समजून घेण्याची आणि त्यानंतर जास्त हुशारीने, जास्त तयारीने सुरूवात करण्याची कुवत आपल्यात आहे अशा विश्वासानंच त्या ही सुरूवात करणार आहेत.

आता मनात घोळतंय की,

पतसंस्थेचं काम, त्याचं राजकारण महिलांना पेलेल का?

मोठ-मोठ्या सरकारी योजनांमध्ये त्यांचा निभाव लागेल का?

स्वतंत्रपणे चालून बघायला त्यांना जमेल का?

अर्थात 'काळ' याचं उत्तर देईल.

घराबाहेर न पडणाऱ्या महिलांची एवढी वाटचाल कशामुळे झाली? चार वर्षापूर्वी संस्थेला बचत गटांच्या कामासाठी मदतनीस हवी होती, तेव्हा कष्टानं एक मदतनीस मिळाली. आज कितीतरी संख्येत, चांगल्या शिकलेल्या मुली, महिला, स्वत:हून बचत गटांचं काम करण्यासाठी अर्ज करतायत. त्यामुळेच बचत गटाचं काम ५ वर्षात एवढं वाढलं आणि समाजाची त्याकडे पाहण्याची नजर बदलली आहे. यामुळे महिलांना हे काम जमेल असा विश्वास वाटतो.

## गटांची स्वयंपूर्णता

या सगळ्या ५ वर्षांकडे थांबून पाहिलं, तर दिसतं की गट संख्येनं जसे वाढले, तसे गुणांनीसुद्धा वाढले! अगदी ठळक गोष्ट वाटते ती म्हणजे गटांची स्वयंपूर्णता.

गटातून संस्थेत जमा होणारा व्यवस्थापनाचा खर्च म्हणजे संघनिधी. गटांचे व्यवहार चोख असावेत, गटांचे व्यवहार तपासून घेता यावेत, म्हणून गटसंघनिधी जमा करतात. गटाला संस्थेतून मिळणारी सेवा फुकट वापरू नये, म्हणून गट ही रक्कम जमा करतात. त्यामुळे गटांना संस्थेचे हक्काचे व्यावहारिक मार्गदर्शन कायम मिळते. त्यातून संस्थेचा सर्व खर्च प्रत्यक्षात भागत नाही. परंतु गटांना मात्र असे व्यवस्थापकीय शुल्क देण्याची सवय लागते, ज्यामुळे गट अधिक स्वयंपूर्ण बनतात.

आर्थिक स्वयंपूर्णता हा स्वयंपूर्णतेचा एक भाग. दुसरा म्हणजे उपक्रमांची स्वयंपूर्णता. संस्थेच्या कार्यकर्त्यांनी गट घेतला तरच गट होणार ही परिस्थिती बदलूनही काही वर्षं झाली आहेत. जुन्या-जाणत्या गटांकडून शिकत, गटप्रमुखांच्या आणि संघटिकांच्या मदतीनं अनेक गट व्यवस्थित चालत आहेत. देण्या-घेण्याचे सर्व व्यवहार महिला चोखपणे

पार पाडतात, स्वत:च्या मनाने नवीन गट सुरू करतात, गटांच्या संख्येमध्ये स्थानिक महिलांच्या पुढाकारामुळे व गटाच्या ताकदीमुळे सतत भर पडत राहते.

गटाची ताकद महिलांना समजली आणि मग हळूहळू गट त्यांनी आपला मानला. गावा-गावातून स्वत:च्या ताकदीवर विश्वास असणाऱ्या महिला, गटाची जबाबदारी घेण्यासाठी पुढे येऊ लागल्या. स्थानिक गटप्रमुखांनी बचत गटाची सर्व जबाबदारी घेतल्यामुळे उपक्रम फक्त प्रबोधिनीचा राहिला नाही. महिलांचा, गावांचा झाला आणि म्हणून तो रुजला, फोफावला, विस्तारला आणि वाढलाही.

***

**अर्थिक साहाय्याच्या कारणाची वर्गवारी**

जून १९९७ साली प्रबोधिनीच्या गटांना सुरु होऊन २ वर्षे पूर्ण झाली. त्या निमित्ताने २ वर्षात अर्थसाहाय्याच्या कारणांची अधिक माहिती घेतली तेव्हा खालील गोष्टी लक्षात आल्या.

| क्र. | कारण | संख्या | % | रक्कम | % |
|---|---|---|---|---|---|
| १ | नित्य घरखर्च, कपडे | ७१ | २४ | ५७,४०० | २१ |
| २ | शेती, विहीर, जनावरे | ४४ | १५ | ६०,९०० | २२ |
| ३ | धार्मिक विधी | ४३ | १५ | ४५,२०० | १६ |
| ४ | कर्जफेड | ३६ | १२ | २३,८०० | ८ |
| ५ | जागाखरेदी, परदुरुस्ती वस्तू खरेदी | ३२ | ११ | ३५,००० | १३ |
| ६ | व्यवसाय | २८ | ९ | ३०,५०० | ११ |
| ७ | आरोग्य | २४ | ८ | १७,७०० | ६ |
| ८ | शिक्षण | १० | ३ | ५,८०० | २ |
| ९ | प्रवास | ४ | २ | ३,२०० | १ |
| | एकूण | २९२ | १०० | २,७९,५०० | १०० |

## घडण संघटिकांची .......

ज्यांची ओळख करून घेतल्याशिवाय ही घडण्याची कहाणी पूर्ण होणार नाही. अशा बचतगट संघटिकांची ही ओळख.

गटामध्ये येऊन थोडी-थोडी जबाबदारी घ्यायला शिकता शिकताच या सगळ्याजणींचा विश्वास इतका वाढला, की त्या संघटिका झाल्या. कोणतंही काम टिकायचं आणि वाढायचं असेल, तर स्थानिक लोकांनी ते काम आपलं मानायला लागतं. अशा स्थानिक संघटिका तयार झाल्या, हीच या कामाची खरी ताकद. या त्यांच्याच गावच्या महिलांची ताकद, मर्यादा अन् अडचणीही चांगल्याच जाणून असतात. त्यांनी त्या कधीतरी अनुभवलेल्या असतात. म्हणूनच गटांना वळण कसं लावायचं हे समजू शकतं. त्यामुळे अनेकीनां त्या आता आदर्श वाटत आहेत.

''मला काहीतरी चांगले काम करायचय, पण संधी मिळत नाही'' असं म्हणणाऱ्या सातवी शिकलेल्या गंगूताईंना, हिशोब चांगले येत होते, म्हणून त्या हिशोब सांभाळायला लागल्या. ते करताना लिहिण्या-वाचण्याची गोडी लागली. आता त्या बी. ए. च्या पदवीची पूर्वपरीक्षा देण्याची तयारी करत आहेत.

माहेरी परत आलेल्या आशाताई गोगावल्यांना, गटात येऊन हरवलेला सन्मान परत मिळाला. ''मला आधार मिळाला तसा बाकीच्यांनाही मिळाला पाहिजे,'' अशा इच्छेनं त्या संघटिका झाल्या. धीटपणे बोलणं, मोठ्या रकमांचे व्यवहार करणं त्या शिकल्या एवढंच नाही तर बैठकीच्या निमित्ताने गावोगावी जाऊन गटाचा सांगावा त्यांनी इतराना दिला त्यासाठी रात्री गावांना मुक्कामही केला असं काम करण्याचा पायंडा त्यांनी प्रथम घातला. एकटीलाही गटाचे पाठबळ असलं, तर स्वतःला कसं घडता येत. याचा धडाच त्यांनी घालून दिला.

''माझ्या शिक्षणाचा उपयोग झालाच पाहिजे,'' असं म्हणून आशाताई सुर्वे सगळ्या गटांचे हिशोब चोख सांभाळतात. त्यांनी गटाच्या कारभाराचा

पाया भक्कम केला. हे काम करताना आत्मविश्वासाअभावी रेंगाळलेली बी. कॉम. ची पदवी मिळविण्याची हिंमतही त्यांना त्यातून मिळाली.

स्वतःचा स्वाभिमान हरवून बसलेल्या शिवऱ्याच्या सीमाताईंना, गटातूनच तो स्वाभिमान आणि जगण्याची उमेद परत मिळाली. धडपड करणाऱ्या बायजा शेलारनं शारिरिक अधूपणावर मात करुन सरकारी योजना तळागाळापर्यंत कशा पोहोचवायचा व प्रत्यक्षात आणण्याचा वसा घेतलाय. सुनीता मुजुमलेलाही ताठ माननं जगण्यासाठीचं पाठबळ गटाच्या कामातुन मिळालय. शिवाय तिच्यातल्या कल्पक आणि धडपड्या उद्योजिकेला वाढण्याची संधी मिळाली.

तोरण्याच्या कुशीतल्या सुजाता, वनिता, रेश्मा, शैला यांनी बचत गटातून आरोग्याचा वसा कानाकोपऱ्यातल्या महिलांपर्यंत पोचावायचं अवघड काम हातात घेतलंय. 'इच्छा आहे पण जमाणार कसं?' अस वाटणाऱ्या आता काम करता करता सारं जमून गेल, आणि काम करताना त्यांची स्वतःची समजही कितीतरी बदलली आहे.

या सगळ्यांना एकत्र काम करण्याची, घर-शेत यापेक्षा वेगळ्या गोष्टी करण्यातली गंमत कळली, त्याची गोडी लागली, गटाचे काम केल्याशिवाय करमेनासं झालं आणि हिंमत वाढली. बचत गटाचा संसार करण्याचं कर्तेपण गटाच्या कामामुळे त्यांना मिळालं. सगळ्यात मोलाचं म्हणजे संघटिका म्हणून काम करताना, त्यांची नजर विस्तारली. गंगूताईंच्याच शब्दात सांगायचं झालं तर '' चुलीपाशी बांधून पडलेली नजर आकाश बघायला शिकली. ''म्हणूनच एतक्या सगळ्या जर्णींमधून या घडल्या - वाढल्या, तिथेच थांबून राहिल्या नाहीत.

जोपर्यंत आपण कुठून-कशा घडलो याचा त्यांना विसर पडत नाही, आणि प्रामाणिकपणे स्वतः घडता-घडता इतरांनाही घडवण्यांचा वसा त्या चालवताहेत, तोपर्यंत त्यांच्या वाढणअयानं आणि घडण्यानं, कितीतरीजणींना मोलाची सांथ मिळणार आहे.

आता शिकावं आणि करावं तेवढं थोडच हे त्यांना समजलेलं आहे.

***

## हे तर पहिलं पाऊल !

हे सारं असं घडलं .
आता कुठे प्रबोधिनीच्या मदतीनं
एकेकीच्या प्रवासाला सुरुवात झाली आहे.
अजून बऱ्याच जणींसाठी,
'हे सारं जमू शकेल',
असा आशावाद निर्माण झाला आहे.

ह्या साऱ्यामुळे,
महिलांचे विश्व मोठे झाले,
जगण्याची उर्मी वाढली,
स्वत:वरचा विश्वास दुणावला
हे तर खरच !

आत्ताशी कुठं आजूबाजूला बघायला सुरूवात झाली आहे.
अजून अडचणींवर मात करायला लागणारी,
ताकद आजमावायला,
स्वत:च्या पायावर भक्कम उभं राहायला, वेळ आहे.
त्यांनतरच टिकणारे परिणाम दिसतील.

या साऱ्यातून,
घराघरात बदल होणार,
कुटुंबातील नाती-गोती अन् भावकीही न विस्कटता
हे बदल स्विकारायला,

साऱ्यांनाच शिकायचंय.
यातून गावोगावच्या नेतृत्वावरही प्रभाव पडणार आहे.
आत्ताशी कुठं अधिकाराची ओळख झाली,
तो अधिकार,
कुठल्याही परिस्थितीत, कुठल्याही आमिषाला न भुलता,
समर्थपणे विधायक परिणाम घडण्यासाठी
वापरायला शिकायचंय.
आणि असं करायलही शिकवायचंय.

गावाला वळण लावायचं,
शाळा, बालवाडी जिवंत करायची,
आरोग्यकेंद्र धीर देणारं, खात्रीचं करायचंय.
पंचायतीत सर्व बाजू मांडून,
चर्चा करुन, निर्णय घ्यायला,
घेतलेले निर्णय वाढवायला, शिकायचंय.
काम करायला आणि करवून घ्यायला शिकायचंय,
आणि सारं करायचं ते, गावातल्या, आणि गावकुसा बाहेरच्या,
वाडी-वस्तीवरच्या, सर्वांना बरोबर घेऊन.

तरीही गावातलं गावपण जपायचं आहे.
हे करताना कुठं खटकलं
तर आपुलकीनं सांधून घ्यायचय.
कडू विसरुन,
साऱ्यांनीच आनंदानं, समाधानानं जगायला शिकायचंय.
आपापसातले सारे भेद विसरुन,
एकमेकींमधलं विश्वासाचं नातं बळकट करत,

एकमेकींना आधार देत,
पुढे जायचंय.
याला शिक्षणाची, अनुभवाची जोड द्यायची आहे.
ही सारी समजूत
या पिढीनं शिकून घेऊन, जाणून घेऊन,
पोरींना, सुनांना आणि लेकांना सुद्धा याचा वसा द्यायचाय.

आताआदर्श म्हणून 'कुणाकडे बघू'? 'कोणासारखी होऊ'?
असं 'कुणाला तरी' शोधत न बसता,
स्वत: पासून सुरू केलेलं घडणीचं काम
पुरं करायच्या मागं लागायचंय.

आधीच खूप उशीर झालाय,
चला तर कामाला लागू...
लक्षात ठेऊया
अजून बराच दूरवरचा पल्ला गाठायचाय
त्यातलं हे तर केवळ पहिलं पाऊल!

***



# गटात पैसे खेळल्यामुळे.....

**परिशिष्ट १**

**नमुना गट**

१. सभासद दरमहा बचत रू. २५ /-     २. दरमहा सेवाशुल्क दर २%

३. सभासद संख्या २०

**नियम –**

१. एका वर्षासाठी एका सभासदास जास्तीत जास्त अर्थसाहाय्य रू. ५०० द्यावे.

२. घेतलेल्या अर्थसाहाय्याची फेड रू. १००/- दरमहा प्रमाणे करावी.

३. जिच्या अंगावर अर्थसाहाय्य नाही तिला आधी अर्थसाहाय्य द्यावे.

| महिना | बचत | सेवाशुल्क प्रत्येकीचे जमा | परतफेड प्रत्येकीची | एकूण महिन्याची रोख जमा | अर्थसाहाय्य | कोणाला दिले | किती जणींना | आत्तापर्यंत एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५०० | - - | - | ५०० | ५०० | महिला१ | १ | १ |
| एकूण | ५०० | – | – | ५०० | ५०० | | १ | १ |
| २ | ५०० | म१ १० | १०० | ६१० | ३१० | महिला२ | | |
| | | | | | ३०० | म३ | | |
| एकूण | ५०० | १० | १०० | ६१० | ६१० | | २ | ३ |
| ३ | ५०० | म१ ८ | १०० | | | | | |
| | | म२ ६ | ११० | | ५०० | म४ | | |
| | | म३ ६ | १०० | | ३३० | म५ | | |
| एकूण | ५०० | २० | ३१० | ८३० | ८३० | | २ | ५ |
| ४ | ५०० | म१ ६ | १०० | | | | | |
| | | म२ ४ | १०० | | ४०० | म६ | | |
| | | म३ ४ | १०० | | ३०० | म७ | | |
| | | म४ १० | १०० | | ३६० | म८ | | |
| | | म५ ६ | १३० | | | | | |
| एकूण | ५०० | ३० | ५३० | १०६० | १०६० | | ३ | ८ |
| ५ | ५०० | म१ ४ | १०० | | | | | |
| | | म२ २ | १०० | | ४०० | म९ | | |
| | | म३ २ | १०० | | ४५१ | म१० | | |
| | | म४ ८ | १०० | | ५०० | म११ | | |
| | | म५ ४ | १०० | | | | | |
| | | म६ ८ | १०० | | | | | |
| | | म७ ६ | १०० | | | | | |
| | | म८ ७ | ११० | | | | | |
| एकूण | ५०० | ४१ | ८१० | १३५१ | १३५१ | | ३ | ११ |

पुढे चालू, पान ७३ पाहू

पान ७२ वरुन पुढे चालू

| महिना | बचत | सेवाशुल्क प्रत्येकीचे जमा | परतफेड प्रत्येकीची | एकूण महिन्याची रोख जमा | अर्थसाहाय्य | कोणाला दिले | किती जणींना | आत्तापर्यंत एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | ५०० | म१ २ | १०० | | | | | |
| | | म२ - | - | | ५०० | म१२ | | |
| | | म३ - | - | | ५०० | म१३ | | |
| | | म४ ६ | १०० | | ४५३ | म१४ | | |
| | | म५ २ | १०० | | | | | |
| | | म६ ६ | १०० | | | | | |
| | | म७ ४ | १०० | | | | | |
| | | म८ ५ | ५० | | | | | |
| | | म९ ८ | १०० | | | | | |
| | | म१० ९ | १५१ | | | | | |
| | | म११ १० | १०० | | | | | |
| एकूण | ५०० | ५२ | ९०१ | १४५३ | १४५३ | | ३ | १४ |
| ७ | ५०० | म१ - | - | | | | | |
| | | म२ - | - | | ४०० | म१५ | | |
| | | म३ - | - | | ४०० | म१६ | | |
| | | म४ ४ | १०० | | ४०० | म१७ | | |
| | | म५ - | - | | ३१६ | म१८ | | |
| | | म६ ४ | १०० | | | | | |
| | | म७ २ | १०० | | | | | |
| | | म८ ४ | १०० | | | | | |
| | | म९ ६ | १०० | | | | | |
| | | म१० ६ | १०० | | | | | |
| | | म११ ८ | १०० | | | | | |
| | | म१२ १० | १०० | | | | | |
| | | म१३ १० | १०० | | | | | |
| | | म१४ ९ | ५३ | | | | | |
| एकूण | ५०० | ६३ | ९५३ | १५१६ | १५१६ | | ४ | १८ |
| ८ | ५०० | म१ - | - | | | | | |
| | | म२ - | - | | | | | |
| | | म३ - | - | | | | | |
| | | म४ २ | १०० | | | | | |
| | | म५ - | - | | | | | |
| | | म६ २ | १०० | | | | | |
| | | म७ - | - | | | | | |

पुढे चालू, पान ७४ पाहू

पान ७३ वरुन पुढे चालू

| महिना | बचत | सेवाशुल्क प्रत्येकीचे जमा | परतफेड प्रत्येकीची | एकूण महिन्याची रोख जमा | अर्थसाहाय्य | कोणाला दिले | किती जणींना | आत्तापर्यंत एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | म८ २ | १०० | | ५०० | म१९ | | |
| | | म९ ४ | १०० | | ५०० | म२० | | |
| | | म१० ४ | १०० | | ४०० | म १ | | |
| | | म११ ६ | १०० | | ४९० | म २ | | |
| | | म१२ ८ | १०० | | | | | |
| | | म१३ ८ | १०० | | | | | |
| | | म१४ ८ | १०० | | | | | |
| | | म१५ ८ | १०० | | | | | |
| | | म१६ ८ | १०० | | | | | |
| | | म१७ ८ | १०० | | | | | |
| | | म१८ ६ | ११६ | | | | | |
| एकूण | ५०० | ७४ | १३१६ | १८९० | १८९० | | ४ | २२ |
| • एकूण | ४००० | २९० | ४९२० | ९२१० | ९२१० | | – | २२ |

• आठ महिन्यांची बेरीज

- **८ महिन्यात प्रत्येकीस किमान एकदा तरी अर्थसाहाय्य मिळाले आहे.** व २ जणींना २ वेळा अर्थसाहाय्य मिळाले आहे.
- ८ महिन्यात प्रत्येकीची बचत रू. २०० जमा झाली. **बचतीच्या दीडपटीपेक्षा (रु. ३०० पेक्षा) जास्त रक्कम, प्रत्येकीने ८ महिन्यात वापरली.**
- **गटात बचतीचे रू. ४००० व सेवाशुल्काचे रू. २९०** म्हणजे एकूण रु. ४२९० जमा असताना, एकूण अर्थसाहाय्य रू. ९२१० वाटप झाले. याचा **अर्थ ४९२० रु. पुन्हा पुन्हा वापरल्यामुळे (परतफेडीमुळे) उपलब्ध झाले. (९२१०–४२९०=४९२०)**
- गटात ८ महिन्यात रू. २९० सेवाशुल्क जमा झाले याचा अर्थ या उलाढाली केल्यामुळे **प्रत्येकीला तिच्या बचतीवर (रू. २०० वर) रू. १४.५ सेवाशुल्क ८ महिन्यात मिळाले.**
- **७ व्या महिन्याच्या अर्थसाहाय्य वाटपानंतर १३ जणींकडे गटाचे पैसे आहेत. याचा अर्थ २० जणींपैकी १३ जणींना (६५%) गटाचा लाभ मिळत आहे** व उरलेल्या ७ पैकी ५ जणींच्या कर्जाची फेड पूर्ण झालेली आहे.

***

# ज्ञान प्रबोधिनी

## गटवाढीचा तक्ता

जून १९९५ मध्ये ज्ञान प्रबोधिनीमध्ये बचत गट या उपक्रमाला सुरुवात झाली. पहिले दोन महिने, गटा विषयीची कल्पना पटवून देण्यात गेले. त्यानंतर सप्टेंबर ९५ मध्ये पहिल गट सुरु झाला. प्रबोधिनीमध्ये गटाच्या कामाने विश्वास आला, त्यामुळे काम वाढत गेले ते समजण्यासाठी दरवर्षीच्या सप्टेंबर महिन्यातील उलाढाल खालीदिलेली आहे.

| एका महिन्याची | गावे | गट संस्था | सप्टेंबर महिन्याची बचत जमा | सप्टेंबर महिन्यातील अर्थसहाय्य | लाभार्थी |
|---|---|---|---|---|---|
| सप्टेंबर १९९५ | १ | १ | ३८० | ३८० | १ |
| सप्टेंबर १९९६ | ३ | १२ | ५७६० | १६४५० | २७ |
| सप्टेंबर १९९७ | ९ | ४० | १९८०० | ७०४१६ | ७० |
| सप्टेंबर १९९८ | १६ | ७५ | ४२८८० | १९८८९३ | ११८ |
| सप्टेंबर १९९९ | ३९ | १३५ | ९८९८९ | २८१३८५ | २९३ |
| सप्टेंबर २००० | ४४ | १६६ | ११६८०० | ३८०७६० | २०० |

# अस्सं माहेर सुरेखबाई

माझ्याबाई माहेराला मायंदळ मायाळू लोक
गाव सुधारलं अन् पोरांचं जाग्यावर डोकं ॥

बाया माणसांना कामाचा भार, हिंडतोय बाप्या दारोदार
पोरांचा भार अन् गोंधळ फार, खाण्यापिण्याची मारामार
हे नाही माहेरी घरी अन् बाहेरी, समद्यांचं वागणं येक ॥

निर्मळ गोठा निर्मळ चूल, हसतंय खेळतंय निर्मळ मूल
गोठ्यात गाई न् दुधाचा पूर, मुबलक खाणं न् बाटली दूर
सासर असलं माहेर तसलं, लई लई न्यारा झोक ॥

तालीम देऊळ, लेझिम, ढोल, शिवार हिरवं तालात डोलं
भांडण, तंटा चहाडी नाही, भूतखेत करणी न् कुभांड नाही
सावकार सरला, मारवाडी मेला, समद्यांचं व्यवहार चोख ॥

बाया बाप्यांना कामाची घाई, रिकाम्या गड्यांची भजनाची घाई
मुलगा न् मुलगी शाळंला जाई, रिकामा माणूस पारावर नाही
सुनेला छळणं कोर्टात पळणं, समद्यांच टळलंय धोकं ॥

माहेर मोठं न् सासर खोटं, निसतच रडण्यात मायंदळ तोटं
भांडण आवरु, घरदार सावरु, बाप्यांच्या जोडीनं घरदार सावरु
गरीबी टाळू, दागिनं माळू सोन्याला देऊन ठोकं ॥

***

# ज्ञान प्रबोधिनी ग्राम विकसन प्रभाग

## *शिक्षण*

**⁕ अनौपचारिक शिक्षण** – शैक्षणिक दृष्ट्या मागास गावांमध्ये बाल संस्कार केंद्रे.

• पर्यावरणासंबंधी जागृती • उत्सवांमधून लोकशिक्षण • ग्रामस्थांच्या अभ्याससहली

**⁕ शेती सुधारणा मंडळ** – चारसूत्री भातशेती पद्धतीचा प्रसार, फळबाग लागवड, गांडूळ खत व सेंद्रिय खताचा प्रसार. • औषधी व सुगंधी वनस्पतींची लागवड.

## *आरोग्य*

**⁕ कुष्ठरोग निवारण** - ४ तालुक्यांमधील २३६ खेड्यांमध्ये कुष्ठरोग निवारणाचे काम १९८१ पासून चालू. • रहाटवडे व वरवे येथे आरोग्य केंद्रे चालू. • शिवापूर व नसरापूर येथे स्थायी व वेल्हे, आंबवणे व भोंगवली येथे फिरते उपचार केंद्र. बऱ्या झालेल्या रूग्णांचे व्यावसायिक पुनर्वसन.

**⁕ मूलभूत आरोग्य कार्यक्रम** - वेल्हे तालुक्यातील दुर्गम अशा २८ गावांमध्ये स्थानिक आरोग्य प्रबोधिकांच्या साखळीद्वारे सुरू असलेला दीर्घकालीन प्रकल्प. माता व बालके यांच्या आरोग्यावर जागृती, प्रशिक्षणाच्या अंगाने काम.

## *संघटन*

**⁕ किशोरी विकास उपक्रम** - ग्रामीण किशोरींसाठी साप्ताहिक दले, क्रीडाकौशल्ये व अभ्यासकौशल्यांचे मार्गदर्शन • सामाजिक परिस्थितीविषयी जागृती कार्यक्रम. क्रीडास्पर्धा व प्रात्यक्षिके, निवासी शिबिरे.

**⁕ जिजामाता प्रबोधन समिती** - दोन्ही खोऱ्यातील १२ गावांमध्ये १२०० महिलांसाठी आर्थिक विकास,आरोग्य व शिक्षण आणि नेतृत्व विकसन या तीन दिशांनी सुरु असलेला दीर्घकालीन कार्यक्रम. जिजामाता प्रबोधन समित्यांच्या साखळीद्वारे स्त्री शक्ती प्रबोधन.

⁕⁕⁕

*पाणी ऊर्जा हाताला काम । संख्या शिक्षण संघटित ग्राम ।।*




संपर्क : ज्ञान प्रबोधिनी, ग्राम विकसन विभाग, ५१०, सदाशिव पेठ, पुणे४११ ०३० दूरभाष : ०२०-४४७७६९१